१०२ शतकोत्तर वाटचाल
# नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक
NAVAKAL
• पुणे, रविवार १ डिसेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-७५, पाने-८, किंमत : ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 75, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 1 December, 2024 Page- 8 Price- Rs. 7/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

# ईव्हीएमच्या निकालात गडबड आहे का?
## मार्कडवाडीत बॅलेट पेपरने पुन्हा मतदान होणार

**महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होऊन सात दिवस उलटले तरी गोंधळ सुरू आहे. एक सत्तास्थापनेचा गोंधळ आणि दुसरा अविश्वसनीय निकालाचा गोंधळ. महाराष्ट्रात यावेळी ६६ टक्के मतदान झाले. मतमोजणीनंतर जाहीर केलेल्या निकालाबाबत संपूर्ण महाराष्ट्रात संशय व्यक्त केला. २४ आमदारांनी लाखो रुपये भरून फेरमतमोजणीची मागणी केली. महाराष्ट्रात इतक्या मोठ्या संख्येत फेरमतमोजणीची मागणी यापूर्वी कधीच झाली नव्हती. त्याचबरोबर आता सोलापूर जिल्ह्यातील मार्कडवाडी या गावाने अजब निर्णय घेतला आहे. ईव्हीएम मतमोजणीत या गावापुरता जाहीर झालेला निकाल या गावाला मान्य नाही. त्यामुळे हे गाव आता स्वत:पुरता त्याच उमेदवारांसाठी बॅलेट पेपरने मतदान करणार आहे आणि या मतदानाचा निकाल जाहीर करणार आहे. जर हा निकाल ईव्हीएमच्या निकालापेक्षा वेगळा ठरला तर ईव्हीएमबाबत निर्माण झालेला संशय अधिकच बळावणार आहे.**

■ मुंबई

**सोलापूर** जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात मार्कडवाडी येथे शरद पवार गटाचे उत्तम जानकर आणि



भाजपाचे राम सातपुते हे दोन आघाडीचे उमेदवार होते. या गावाने आतापर्यंत उत्तम जानकर यांना साथ दिली होती. त्यातच उत्तम जानकर यांचे कट्टर विरोधक असलेले मोहिते-पाटील यांनी यावेळी उत्तम जानकर यांना पाठिंबा जाहीर केला होता. यामुळे उत्तम जानकर यांचा विजय निश्चित मानला जात होता. उत्तम जानकर हे शेवटच्या टप्प्याच्या मतदानात १३ हजार मतांच्या आघाडीने विजयीही झाले. मात्र ते केवळ १३ हजार मतांनी विजयी झाले याबाबत संशय व्यक्त होत आहे. इतकेच नव्हे तर कायम उत्तम जानकर यांच्या पाठीशी राहिलेल्या मार्कडवाडीत त्यांना कमी मते पडली आणि भाजपाचे सातपुते यांना अधिक मते पडली. हे मतमोजणीत उघड झाले. मात्र गाव कायम उत्तम जानकर यांच्या पाठीशी असल्याने आपल्या गावात सातपुते यांना अधिक मते पडली हे गावकरी मानायला तयार नाहीत. यासाठीच आता या गावाने बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे खरे काय झाले याचा उलगडा होईल, असे गावकऱ्यांचे मत आहे.

» पान २ वर

### ५ डिसेंबरला शपथविधी

गेला आठवडाभरापासून प्रतीक्षा असलेला महायुती सरकारच्या शपथविधीचा मुहूर्त आज अखेर ठरला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी आज माहिती दिली की, ५ डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर संध्याकाळी ५ वाजता सरकारचा शपथविधी होणार आहे. पंतप्रधान मोदी या शपथविधीला उपस्थित राहणार आहेत. २ डिसेंबर रोजी भाजपा कोअर कमिटीची बैठक होऊन या बैठकीला अमित शहा ऑनलाईन मार्गदर्शन करतील. त्यानंतर ३ डिसेंबरला भाजपा आमदारांची बैठक होऊन गटनेता म्हणजेच मुख्यमंत्री उमेदवाराची निवड होईल. त्यानंतर ५ डिसेंबरला मंत्रिपदाचा शपथविधी सोहळा होईल. मात्र मुख्यमंत्रिपदी कोण असणार याचा सस्पेन्स

» पान २ वर

# युकेमध्ये मरणासन्न रुग्णांच्या इच्छामरणाला परवानगी




**इंग्लंड आणि वेल्स या प्रांतात असाध्य आजाराने ग्रासलेल्या रुग्णांना इच्छामरणाची परवानगी देणाऱ्या विधेयकाला युकेच्या खासदारांनी मंजुरी दिली आहे. या विधेयकाला तत्त्वत: मान्यता मिळाल्यामुळे असिस्टेड म्हणजे इतरांच्या मदतीने इच्छामरण घेण्याचा मार्ग यामुळे मोकळा होणार आहे. हा कायदा तूर्तास स्कॉटलंड आणि उत्तर आयर्लंडमध्ये लागू होणार नाही.**

■ लंडन

**खासदार** किम लीडबीटर यांनी युकेच्या संसदेच्या कनिष्ठ सभागृहात (हाऊस ऑफ कॉमन्स) हे ऐतिहासिक विधेयक सादर केले. पाच तासांच्या भावनिक आणि जोरदार चर्चेनंतर या विधेयकावर झालेल्या मतदानात विधेयकाच्या बाजूने ३३० आणि विरोधात २७५ मते पडली. आता या विधेयकाला वरिष्ठ सभागृहात मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा लागू करण्यात येईल.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार ज्याचा मृत्यू सहा महिन्यांच्या आत होऊ शकतो अशा मरणासन्न अवस्थेत असणाऱ्या १८ वर्षांवरील रुग्णांना या विधेयकामुळे सन्मानपूर्वक मरण पत्करण्याचे स्वातंत्र्य मिळेल. मात्र, त्यासाठी रुग्णावर कुठलाही दबाव नाही, हे सिद्ध करावे लागेल. त्याच्या प्रकृतीची संपूर्ण तपासणी करून दोन डॉक्टर आणि हायकोर्टाच्या न्यायाधीशांच्या सहीच्या पत्रानंतरच त्याला इच्छामरण मिळू शकेल.

या कायद्यामुळे मरणासन्न अवस्थेतील रुग्णांना अनावश्यक वेदना, त्रास, दु:ख सहन करावे लागणार नाही, असे मत विधेयकाला समर्थन देणाऱ्यांनी व्यक्त केले आहे. तर, या विधेयकामुळे अनेकांचे जीव धोक्यात येतील, या सवलतीचा गैरवापर होऊ शकतो, काही वेळा आयुष्य संपविण्यासाठी दबावही टाकला जाऊ शकतो, अशी भूमिका विरोधकांनी घेतली होती.

या विधेयकामुळे देशाच्या आरोग्य सेवेवर पडणारा ताण आणि सामाजिक व धर्मादाय सेवा यावर होणारा परिणाम याबद्दल काही तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. सामाजिक आणि धर्मादाय सेवा आधीच आर्थिक अडचणीत असताना इच्छामरणाबाबत खर्चाचा भार सरकारवरच

» पान २ वर

# पैशाचा पूर आणि सत्तेचा गैरवापर!
## जनता अस्वस्थ! शरद पवारांना चिंता

■ पुणे

**राज्यघटना** आणि लोकशाहीची सुरू असलेली थट्टा यांचा निषेध व्यक्त



करण्यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे गेल्या तीन दिवसांपासून आत्मक्लेश उपोषण सुरू आहे. त्यांच्या उपोषण स्थळी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज भेट दिली. आढाव यांच्या आंदोलनाला पाठिंबा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये सत्तेचा व पैशाचा गैरवापर झाला. या बाबी पूर्वी कधी झाल्या नव्हत्या, असे ते यावेळी म्हणाले.

### बाबा आढाव यांची भेट घेतली

शरद पवारांनंतर अजित पवार आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील बाबा आढाव यांची भेट घेतली. बाबा आढाव यांनी उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पाणी पिऊन उपोषण सोडले.

शरद पवार म्हणाले की, विधानसभा निवडणुकीचा निकाल

» पान २ वर

# फेंगल वादळाचा तडाखा
## तामिळनाडूत शाळांना सुटी जाहीर

■ चेन्नई

### विमानसेवा बंद

**बंगालच्या** खाडीतील कमी दाबाच्या टप्प्यामुळे निर्माण झालेले चक्रीवादळ तामिळनाडूत धडकण्याच्या आधी प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून, तामिळनाडूतील किनारपट्टीच्या गावातील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. चेन्नई विमानतळावरील हवाई वाहतूकही बंद करण्यात आली आहे. तसेच लोकांना घरातच राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

तामिळनाडूच्या चेन्नई, तिरुवल्लूर, चेंगलपट्टू, काचींपूरम, लिल्पूरम, कल्लाकुरिची, कुड्डालोर जिल्ह्यांबरोबरच पुद्दुचेरी येथे मुसळधार पाऊस पडला असून अनेक भागांत पाणी साचले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व आयटी कंपन्यांना आपल्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम करायला सांगितले आहे. चेन्नई शहरात अनेक रस्ते जलमय झाले असून,

» पान २ वर

# काँग्रेसने तिकीट देऊन वाऱ्यावर सोडले

■ जालना

**काँग्रेसने** आम्हाला फक्त तिकीट दिले. नंतर प्रत्येकाला वाऱ्यावर सोडून दिले, असा आरोप जालन्यातील काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी आपल्याच पक्षावर केला. जालना मतदारसंघात काँग्रेसच्याच काही लोकांनी गद्दारी केली असल्याचा आरोपही त्यांनी केला. गोरंट्याल जालना मतदारसंघात अर्जुन खोतकरांकडून पराभूत झाले आहेत. गोरंट्याल म्हणाले की, प्रदेश काँग्रेस कमिटीने ज्या पद्धतीने निवडणूक लढायला पाहिजे होती त्या पद्धतीने लढली नाही. आम्हाला पक्षाकडून कुठलाही रिस्पॉन्स मिळाला नाही. काँग्रेसने एकही सभा घेतली नाही. जी काही सामग्री द्यायला पाहिजे होती ती दिली नाही. वरून पक्षातल्या काही लोकांनी गद्दारी केली. त्यांची आपण वरिष्ठ पातळीवर तक्रार केली आहे. शिवसेना आणि भाजपच्या प्रत्येक उमेदवाराला ४० ते ५० कोटी रुपये पार्टीने दिले. अदानींनी धारावी झोपडपट्टीचे काम मिळायला पाहिजे म्हणून त्यांना हे पैसे दिल्याचे आपण ऐकले आहे.

### कैलास गोरंट्याल यांचा घरचा आहेर

# गोयंकांच्या संचालकपद पुनर्नियुक्तीस नकार

**नवी दिल्ली -** झी एंटरटेनमेंट एंटरप्रायजेस लिमिटेड या कंपनीच्या भागधारकांनी पुनित गोयंका यांची संचालकपदी पुनर्नियुक्ती करण्याचा प्रस्ताव नाकारला आहे. या कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, झी एंटरटेनमेंट कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत गोयंका यांच्या पुनर्नियुक्तीचा ठराव फेटाळला गेला. झी एंटरटेनमेंट कंपनीची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी पार पडली. या सभेत ठराव क्रमांक तीनमध्ये पुनित गोयंका यांची संचालक म्हणून पुनर्नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव होता. या प्रस्तावाला केवळ ४९.६४ टक्के मतांनी पाठिंबा मिळाला, तर प्रस्तावाच्या विरोधात ५०.४ टक्के भागधारकांनी मतदान केले. कंपनी कायदा, २०१३ आणि सेबी रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदींनुसार आवश्यक बहुमत मिळाले नाही.

# बांगलादेश हिंदूंवर अत्याचार मुंबईत वकिलातीवर निदर्शने

**मुंबई -** बांगलादेशात हिंदूंवर होत असलेले हल्ले व धार्मिक नेते चैतन्य प्रभू यांच्या अटकेविरोधात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व इतर संघटना मुंबईतील बांगलादेश वकिलातीच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. सोमवारी दुपारी साडेतीन वाजता बांगलादेश वकिलातीच्या जॉली मेकर बंगल्यातील तसेच वर्ल्ड ट्रेड सेंटर येथील कार्यालयासमोर ही निदर्शने करण्यात येणार आहेत.






# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

सिक्युरिटी गार्ड / हाउसकिपिंग, जेन्टस, लेडीज, वरळी, दादर, भायखळा, गोवंडी, माटुंगा, बोरीवली. **8291056761 / 8422880513 /** {NC243358}

मुंबईमध्ये घरी पेशंट सांभाळण्यासाठी आया, वॉर्डबॉयची गरज आहे. **7738306531, 9892479635** {NC243377}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशिअन पाहिजेत. चांगला पगार. इतर सुविधा. **9820683431 / 25325762** {NC243440}

वेस्टर्न, सेंट्रल, हार्बर, ट्रान्स हार्बर एरिया आणि संपूर्ण मुंबईमध्ये कलेक्शन एजन्सी करीता फील्ड एक्झिक्युटिव्ह पाहिजेत: **9175931699/ 7719841273** {NC243445}

ड्रायव्हर पाहिजे राजापूर (जैतापूर) साठी, वय ३० पर्यंत, सुप्रो, क्रेटा गाडी 16K पगार+ फूड+ कुटुंबासाठी राहण्याची सोय. **9819439898** {NC243433}

नोकरीची सुवर्णसंधी
वसई येथील नामांकित कंपनी मध्ये कामासाठी मुले पाहिजेत!
पगार -14,200+PF+Bonus+ESIC + Incentive Scheme
टिप: शिक्षणाची अट नाही
वयोमर्यादा : १८ वर्षे ते ४० वर्षे
सोबत आधारकार्ड, २ फोटो, पॅनकार्ड घेऊन येणे
संपर्क :
**7249541776**
**7666154606**
**8976768971**
*त्वरा करा - मर्यादित जागा उपलब्ध
पत्ता: वसई फाटा जवळ, वसई (पूर्व).

अनुभवी तंदूर कुक पाहिजे राजापूर (जैतापूर)साठी पगार- 15K. **9819439898** {NC243434}

ऑफसेट प्रिंटिंग कंपनीला प्रिंटिंग सुपरवायझर / पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. अंधेरी मरोळनाका संपर्क - **40134600** भेटण्याची वेळ सकाळी 11.00 ते 4.00 {NC243379}

डोंबिवली/ग्रँटरोड केम्स कॉर्नर येथे त्वरित हाऊसकिपर पाहिजे. **9930930188/ 9819292051** {NC243457}

स्क्रिन प्रिंटर, हेल्पर पेपर लॅमिनेशन मशिन ऑपरेटर गिरगाव गायवाडी **9930408427** {NCC240091}

ज्वेलरी कंपनी करिता पॉलिशर आणि फायलर पाहिजे- **9082901106** {NC243505}

हेडलबर्ग २ कलर आणि ५ कलर मशीन चालविण्यासाठी अनुभवी प्रिंटर, फिडरमन आणि फॅक्टरीसाठी हाउसकिपींग पाहिजेत. बाहुबली प्रिंटर्स, ए-२८, घाटकोपर इंडस्ट्रीयल इस्टेट, आर. सिटी मॉलजवळ, घाटकोपर (प.), मुंबई- ४०००८६. 022- **2500 8810/ 9320552709/ 7977185551** {NC243462}

## पाहिजेत

टॅलीचे ज्ञान असलेले अनुभवी अकाऊंटंट पाहिजे. सुरेश- **9322660859,** मेहुल- **9930493708** {NC240093}

जोगेश्वरी ऑफीससाठी फीमेल ऑफीस असिस्टंट पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक- **9820412573** {NC243498}

महाविद्यालयीन विद्यार्थिनी पाहिजेत ''लग्न सोहळा मुंबई''चा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी. **9702527373.** {NC243492}

जय अंबे डुप्लेक्स कटींग मशिन (बाइंडर) आणि हेल्पर्स पाहिजे. अंबरनाथ (प.), **8767799009, 9860399009** {NC243499}

## Situation Vacant

REQUIRED 12TH PASSED FEMALE FOR BILLING & ACCOUNTING WORK WITH COMPUTER KNOWLEDGE AT RAHANAL VILLAGE, BHIWANDI THANE. AGE- 26-35 YEARS LANGUAGE KNOWN- HINDI, MARATHI. SALARY- 10,000/-- 12,000/- TIMING:- 9.00 -6.00 SEND RESUME: impress.label@gmail.com **9158648434** {NC243497}

## व्यवसायविषयक

महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC243283}

## वर पाहिजे

सुंदर वधु 27, उंची 5.3, शिक्षण- 12वी, स्टेशनरी दुकानात कामाला वेतन- 9,000/-. मुलीला वडील नाहीत. अपेक्षा- कष्टाळू निर्व्यसनी. जातीची, शिक्षणाची अट नाही. त्वरीत विवाह **7517590524** {NC243482}

सुंदर मुलगी वय २५ शिक्षण तेरावी, प्रायव्हेट जॉब करते (वडिल नाहीत) (जात मराठा) जात शिक्षण वयाची अट नाहीत. संपर्क- **8459998242** {NC243500}

## विवाहविषयक

दि बेस्ट शुभमंगल विवाह मंडळ. नोंदणी- 1000/- दिसी- **7400398921** {NC243506}


# गडचिरोलीतील वैनगंगा नदीत बुडून एकाचा मृत्यू! तिघे वाचले

■ गडचिरोली

**गडचिरोली** शहरापासून तीन किलोमीटर अंतरावरील वैनगंगा नदीच्या बोरमाळा घाटातील पाण्यात आज दुपारी चार मुले बुडाली. यातील तिघे वाचले. मात्र, एकाचा मृत्यू झाला.

जयंत आझाद शेख (१०) असे मृत मुलाचे नाव आहे. रियाज शब्बीर शेख (१४), जिशान फय्याज शेख (१५), लड्डू फय्याज शेख (१३) हे बचावले आहेत. हे सर्व जण दुपारी बोरमाळा नदीघाटावर फिरण्यासाठी गेले होते. सोबत जिशान व लड्डू यांची आई ताजु शेख यादेखील होत्या. ही मुले वैनगंगा नदीपात्रात उतरले. मात्र खोल पाण्याचा अंदाज न आल्याने चारही मुले एकापाठोपाठ एक बुडाली. या मुलांनी आरडाओरडा केल्यानंतर नदीकाठावर असलेल्या ताजु शेख यांनी धावत जाऊन नदीत उडी घेतली. त्यांनी जिशान, लड्डू या आपल्या दोन मुलांसह रियाजला बाहेर काढले. पाण्याच्या प्रवाहात वाहत गेलेल्या जयंत शेखला वाचवण्यात त्यांना यश आले नाही. यावेळी मदतीसाठी काही मच्छीमार धावले. त्यांनी जयंत यास बाहेर काढले. मात्र, दवाखान्यात नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. इतर तीन मुले सुखरूप वाचली.

# इंदापूर अर्बन बँकेचे चेअरमन देवराज जाधवांचा राजीमाना

■ पुणे



**इंदापूर** अर्बन बँकेचे चेअरमन देवराज जाधव यांनी शरद पवार गटात गेलेले हर्षवर्धन पाटील यांना विरोध करत बँकेच्या चेअरमन पदाचा राजीनामा दिला. या बँकेत हर्षवर्धन पाटील यांचे नेतृत्व आहे. विधानसभा निवडणुकीत हर्षवर्धन पाटील यांना सोडचिठ्ठी देत देवराज जाधव यांनी भाजप उमेदवार दत्तात्रय भरणे यांना पाठिंबा दिला होता. देवराज जाधव यांचे इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी पंचक्रोशीत मोठे राजकीय प्रस्थ आहे. नुकत्याच विधानसभा निवडणुकीत दत्तात्रय भरणे यांच्या विजयात जाधव यांचा मोलाचा वाटा होता.

# फेंगल चक्रीवादळाचा तडाखा तामिळनाडूत शाळांना सुटी जाहीर

पान १ वरून

वाहनांना मोठी कसरत करावी लागत आहे. मद्रास विद्यापीठाच्या परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्या आहेत. चेन्नई समुद्र किनारा ते वेलाचेरी दरम्यान चालणारी उपनगरी रेल्वे सेवाही बंद करण्यात आली आहे. चेन्नईचे विमानतळही उद्या सकाळी ७ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे. आज चेन्नईला येणाऱ्या काही विमानांच्या मार्गातही बदल करण्यात आला. या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूत गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी सर्व तयारीचा आढावा घेतला. प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सेवा पुरवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चक्रीवादळामुळे समुद्रात महाकाय लाटा उसळणार असल्याने सर्व मासेमारी व इतर नौका किनाऱ्यावरच नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. अनेक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून, किनारपट्टीवरील गावे रिकामी करण्यात आली आहेत. चक्रीवादळामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# केजरीवालांवर अज्ञाताने द्रव्य पदार्थ फेकला

■ नवी दिल्ली

**फेब्रुवारी** महिन्यात होणार्‍या दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील राजकारण तापले आहे. आज संध्याकाळी ग्रेटर कैलास भागात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांच्यावर अज्ञात व्यक्तीने एका छोट्या बाटलीतून द्रव्य पदार्थ फेकला. या घटनेनंतर गोंधळ उडताच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी या व्यक्तीला पकडले. या हल्ल्यात केजरीवाल यांना कोणतीही दुखापत झाली नाही.

# माजलगावच्या हिंदवी स्वराज्य संस्थेच्या अध्यक्ष-सचिवासह २० जणांवर गुन्हे

■ माजलगाव

**ठेवीदारांनी** विश्वासाने ठेवलेल्या ठेवींच्या गैरवापर करून बनावट फाईल तयार करून बोगस कर्ज, बोगस सोनेतारण, बोगस नोंदी व हातावर रक्कम ठेवून १ कोटी ८ लाख ३६ हजार ८१० रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी हिंदवी स्वराज्य पतसंस्थेशी संबंधीत २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात हिंदवी स्वराज्य पतसंस्थेचा अध्यक्ष रमेश किसन वामन, सचिव महानंदा सखाराम मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश सखाराम मोरे यांच्यासह दहा संचालक, दहा कर्मचारी यांचा समावेश आहे. माजलगाव शहर पोलीस ठाण्यात शासनाचे

**पैशांचा अपहार केल्याप्रकरणी पोलिसांची कारवाई**

सहकारी लेखापरीक्षक यशवंत बन्सीधर शिंदे यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहरातील धारूर रोडवरील असलेल्या हिंदवी स्वराज्य पतसंस्थेत ठेवीदारांना वर्षभर त्यांच्या ठेवी परत न मिळाल्याने त्यांनी जिल्हा निबंधकांकडे संस्थेविरुद्ध तक्रारी दाखल केल्या होत्या. त्या अनुषंगाने शासनाचे लेखापरीक्षक यशवंत बन्सीधर शिंदे यांनी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २४ या कालावधीत या संस्थेचे लेखापरीक्षण केले. या लेखापरीक्षणात संस्थेने कमाल रोख मर्यादेचे उल्लंघन केल्याचे आढळून आले. तसेच बनावट कर्ज प्रकरण, सोने तारण कर्जवाटप करून ते तिजोरीत न ठेवता या रकमेच्या अपहार केला.

# युकेमध्ये मरणासन्न रुग्णांच्या इच्छामरणाला परवानगी

पान १ वरून

पडणार का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. तर डेम एस्थर रँटझेन यांच्यासारख्या बुजुर्ग टीव्ही निवेदकांनी या विधेयकाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. ही निवड स्वातंत्र्य आणि करुणा यांचा विजय आहे, असे त्यांनी म्हटले आहे. ८४ वर्षांच्या रँटझेन स्वतः दुर्धर रोगाने आजारी असून, सध्याच्या कायद्यात बदल करण्याबाबत त्यांनी अनेकदा आपले मत व्यक्त केले आहे. हे विधेयक आता एका समितीकडे पाठवण्यात येईल. तिथे खासदारांना यात सुधारणा-दुरुस्ती सुचवता येणार आहे. या विधेयकावर दोन्ही सभागृहात पुन्हा चर्चा होऊ शकते. त्यामुळे पुढील वर्षीच हा कायदा अस्तित्वात येण्याची शक्यता आहे.

# ईव्हीएम पडताळणीसाठी २४ पराभूत उमेदवारांचे अर्ज! काँग्रेसला आयोगाचे बोलावणे

पान ८ वरून

(कोपरगाव), शरद पवार गटाचे सुनील भुसारा(विक्रमगड), शरद पवार गटाचे प्रशांत जगताप (हडपसर), शरद पवार गटाचे अशोक पवार (शिरूर), शरद पवार गटाचे सचिन दोडके (खडकवासला), शरद पवार गटाचे राहुल कलाटे (चिंचवड), शरद पवार गटाचे चरण वाघमारे (तुमसर), शरद पवार गटाचे फवाद अहमद (अणुशक्तीनगर), ठाकरे गटाचे केदार दिघे (कोपरी पाचपाखाडी), ठाकरे गटाचे राजन विचारे (ठाणे शहर), ठाकरे गटाचे नरेश मणेरा (ओवळा माजिवडा), ठाकरे गटाचे दीपेश म्हात्रे (डोंबिवली), ठाकरे गटाचे एम. के. मडवी (ऐरोली), बविआचे हितेंद्र ठाकूर (वसई), बविआचे क्षितीज ठाकूर (नालासोपारा), बविआचे राजेश पाटील (बोईसर), शरद पवार गटाचे राहुल मोटे (धाराशीव), ठाकरे गटाचे राजन साळवी (राजापूर) यांचा समावेश आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाला ३ डिसेंबर रोजी चर्चेसाठी बोलावले आहे. निवडणूक आयोगाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ही पारदर्शक झाली आहे. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवार/त्यांच्या एजंटांच्या सहभागासह पारदर्शक प्रक्रियेचा वापर करण्यात आला आहे. तसेच राजकीय पक्षांच्या सहभागासह पारदर्शक पद्धतीने मतदार यादी अद्ययावत प्रक्रिया केल्याचेही आयोगाने म्हटले आहे. वैयक्तिकरित्या प्रत्येक उमेदवाराचे लेखी ऐकल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या सर्व समस्यांचे कायदेशीररित्या पूर्तता करू.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण! सर्व २६ आरोपींवर मोक्का

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी आतापर्यंत २६ जणांना अटक केली आहे. या सर्व आरोपींना मोक्का (महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑर्गनाइज्ड क्राइम क्ट) लावला आहे.त्यात मुख्य शूटर शिवकुमार गौतमचा समावेश आहे. तर शुभम लोणकर, जिशान मोहम्मद अख्तर हे आरोपी फरार आहेत. सिद्दीकी हत्या आणि अभिनेता सलमान खानच्या मुंबईतील घराबाहेर गोळीबार केल्याप्रकरणी तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिष्णोईवर संशय असून त्याता भाऊ अनमोल बिष्णोईला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे.

१२ ऑक्टोबर रोजी रात्री अजित पवार गटाचे नेते आणि माजी आमदार बाबा सिद्धीकी यांचा मुलगा आणि तात्कालीन आमदार झिशान सिद्धीकी यांच्या वांद्रे येथील कार्यालयाबाहेर बाबा सिद्धीकी यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. त्यानंतर त्यांना तत्काळ लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यात बाबा सिद्धीकी यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला होता.

# अमेरिकेत भारतीय विद्यार्थ्याची गोळ्या झाडून हत्या झाल्याने खळबळ

■ शिकागा

**अमेरिकेत** भारतीय विद्यार्थ्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याचा प्रकार शिकोगोजवळील एका गॅस स्टेशनजवळ घडला. साई तेजा नुकारापू असे मृत तरुणाचे नाव असून तो मूळचा तेलंगणा राज्यातील खम्मम जिल्ह्यातील आहे.

बीसाई तेजा नुकारापू याने बीबीए पदवी घेतली होती. तो अमेरिकेत एमबीएचे शिक्षण घेत होता. तसेच तो एका गॅस स्टेशनवर अर्धवेळ नोकरीही करत होता. आज तो ड्युटीवर नव्हता. परंतु स्टेशनवरील मित्राला मदत करत होता. मित्र काही कामानिमित्त गॅस स्टेशनमधून बाहेर गेला होता. त्यावेळी गॅस स्टेशनवर आलेल्या हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळीबार केला. त्यात साई तेज याचा मृत्यू झाल्याची माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली.

## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'

## निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी) — सोडत संध्या. 5:00

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 48 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 30/11/2024

पहिले बक्षिस रु. 10000/- : **MG-06 : 7623**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **2275**

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | | | | |
|---|---|---|---|---|
| 1008 | 4239 (श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी, पुणे) | 4724 (वैशाली लॉटरी, बोरिवली) | 5449 (महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी) | 7114 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 400/- | 1698 | 2648 | 3297 | 4429 | 5261 | 5966 | 6910 | 8283 |
| 1012 | 1820 | 2705 | 3333 | 4433 | 5397 | 6061 | 6969 | 8398 |
| 1141 | 1932 | 2829 | 3504 | 4518 | 5405 | 6411 | 7107 | 8730 |
| 1177 | 2224 | 2870 | 3518 | 4559 | 5455 | 6418 | 7326 | 8782 |
| 1198 | 2248 | 2915 | 3653 | 4665 | 5518 | 6466 | 7409 | 8808 |
| 1217 | 2252 | 3043 | 3737 | 4703 | 5576 | 6467 | 7504 | 8846 |
| 1358 | 2279 | 3066 | 3921 | 4894 | 5591 | 6507 | 8082 | 8884 |
| 1420 | 2506 | 3193 | 4019 | 4916 | 5614 | 6694 | 8128 | 8939 |
| 1597 | 2512 | 3221 | 4254 | 5135 | 5959 | 6781 | 8184 | 8998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 48 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 30/11/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 8400 | 0662 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | 3380 | 1052 (सुमित एजन्सी - मुंबई) | 8513 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 0957 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 4418

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0246 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 1567 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 4252 | 6221 | 8971 | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 3955 | 4345 | 4373 | 4537 | 5663 | 6176 | 7231 | 7574 | 7803 | 8230 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1432 | 4412 | 4735 | 5093 | 5494 | 6770 | 7218 | 7437 | 8369 | 8999 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0897 | 1843 | 3215 | 3953 | 4750 | 5720 | 6650 | 7680 | 8484 | 9318 |
| | 0935 | 1935 | 3246 | 4004 | 4781 | 5756 | 6662 | 7752 | 8487 | 9391 |
| 0016 | 0970 | 1988 | 3316 | 4040 | 4813 | 5758 | 6666 | 7811 | 8529 | 9406 |
| 0067 | 1085 | 2088 | 3342 | 4104 | 4894 | 5785 | 6675 | 7841 | 8581 | 9477 |
| 0150 | 1111 | 2151 | 3356 | 4189 | 5195 | 5999 | 6862 | 7848 | 8587 | 9498 |
| 0155 | 1161 | 2171 | 3358 | 4213 | 5264 | 6147 | 6873 | 7855 | 8626 | 9591 |
| 0305 | 1194 | 2179 | 3361 | 4234 | 5265 | 6181 | 6894 | 7866 | 8702 | 9597 |
| 0377 | 1196 | 2269 | 3366 | 4246 | 5325 | 6197 | 6942 | 7874 | 8714 | 9683 |
| 0406 | 1261 | 2317 | 3368 | 4264 | 5333 | 6266 | 6951 | 8006 | 8720 | 9687 |
| 0409 | 1278 | 2346 | 3431 | 4290 | 5453 | 6306 | 7167 | 8008 | 8762 | 9707 |
| 0422 | 1291 | 2475 | 3434 | 4341 | 5475 | 6356 | 7211 | 8081 | 8837 | 9709 |
| 0494 | 1319 | 2721 | 3436 | 4348 | 5515 | 6436 | 7273 | 8184 | 8873 | 9729 |
| 0500 | 1365 | 2722 | 3445 | 4411 | 5520 | 6522 | 7360 | 8225 | 8880 | 9737 |
| 0578 | 1372 | 2799 | 3568 | 4484 | 5524 | 6530 | 7409 | 8248 | 8888 | 9769 |
| 0656 | 1546 | 2935 | 3624 | 4622 | 5555 | 6562 | 7477 | 8265 | 8893 | 9815 |
| 0760 | 1639 | 3003 | 3726 | 4646 | 5575 | 6621 | 7509 | 8268 | 8918 | 9889 |
| 0787 | 1654 | 3036 | 3755 | 4739 | 5583 | 6629 | 7554 | 8283 | 9019 | 9962 |
| 0825 | 1725 | 3080 | 3777 | 4740 | 5636 | 6645 | 7574 | 8388 | 9173 | 9979 |
| 0850 | 1810 | 3133 | 3883 | 4745 | 5704 | 6647 | 7618 | 8445 | 9221 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 48 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 30/11/2024

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SP-08 : 1777**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **1761**

| तिसरे बक्षिस रु. 2000/- | | |
|---|---|---|
| 5031 (चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक) | 5203 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 5219 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1000 | 1777 | 2542 | 3578 | 4903 |
| 1017 | 1859 | 2567 | 3734 | 5054 |
| 1089 | 2006 | 2614 | 3743 | 5286 |
| 1122 | 2092 | 2819 | 3746 | 5398 |
| 1161 | 2146 | 2960 | 4180 | 5528 |
| 1556 | 2332 | 3271 | 4330 | 5659 |
| 1577 | 2430 | 3388 | 4437 | 5703 |
| 1721 | 2439 | 3573 | 4578 | 5852 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 48 — सोडत दिनांक 30/11/2024

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **ML-03 : 4622**

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- : पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **4622** — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली; आर. के. एन्टरप्रायझेस - चर्चगेट

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2295 | 3899 | 4351 | 5495 | 6547 | 6818 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1634 | 2240 | 2665 | 2972 | 3667 | 5518 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1681 | 1881 | 2145 | 3001 | 4268 | 5105 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1197 | 1658 | 4251 | 4986 | 6204 | 6521 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1811 | 2280 | 2642 | 3002 | 3373 | 3803 | 4349 | 4792 | 5305 | 5775 | 6249 | 6652 |
| | | 1840 | 2281 | 2644 | 3003 | 3388 | 3811 | 4364 | 4793 | 5337 | 5780 | 6252 | 6655 |
| 1011 | 1277 | 1848 | 2288 | 2661 | 3004 | 3391 | 3836 | 4369 | 4801 | 5375 | 5787 | 6268 | 6656 |
| 1019 | 1285 | 1901 | 2299 | 2665 | 3028 | 3407 | 3842 | 4394 | 4803 | 5404 | 5789 | 6276 | 6660 |
| 1020 | 1319 | 1927 | 2321 | 2668 | 3033 | 3419 | 3853 | 4410 | 4834 | 5420 | 5849 | 6286 | 6673 |
| 1030 | 1322 | 1941 | 2334 | 2672 | 3035 | 3424 | 3878 | 4415 | 4841 | 5437 | 5865 | 6287 | 6674 |
| 1048 | 1327 | 1945 | 2335 | 2715 | 3039 | 3427 | 3883 | 4417 | 4848 | 5442 | 5875 | 6299 | 6679 |
| 1051 | 1376 | 1956 | 2340 | 2716 | 3047 | 3434 | 3888 | 4420 | 4849 | 5455 | 5897 | 6307 | 6682 |
| 1055 | 1377 | 1981 | 2351 | 2720 | 3080 | 3453 | 3902 | 4426 | 4868 | 5505 | 5913 | 6314 | 6683 |
| 1087 | 1400 | 1991 | 2359 | 2727 | 3101 | 3468 | 3903 | 4432 | 4887 | 5507 | 5914 | 6359 | 6690 |
| 1091 | 1401 | 2020 | 2380 | 2736 | 3109 | 3469 | 3928 | 4439 | 4943 | 5512 | 5934 | 6364 | 6696 |
| 1101 | 1419 | 2022 | 2384 | 2767 | 3118 | 3508 | 3970 | 4461 | 4944 | 5518 | 5935 | 6391 | 6712 |
| 1103 | 1442 | 2027 | 2392 | 2768 | 3128 | 3513 | 3996 | 4467 | 4956 | 5519 | 5942 | 6405 | 6732 |
| 1108 | 1445 | 2046 | 2404 | 2770 | 3151 | 3520 | 4015 | 4473 | 4973 | 5531 | 5952 | 6437 | 6745 |
| 1110 | 1469 | 2062 | 2413 | 2780 | 3155 | 3523 | 4018 | 4474 | 4974 | 5539 | 5957 | 6443 | 6750 |
| 1120 | 1500 | 2070 | 2421 | 2814 | 3193 | 3526 | 4026 | 4482 | 4990 | 5542 | 5958 | 6457 | 6755 |
| 1123 | 1505 | 2072 | 2441 | 2842 | 3198 | 3528 | 4027 | 4503 | 5002 | 5548 | 5982 | 6465 | 6762 |
| 1142 | 1515 | 2082 | 2452 | 2845 | 3200 | 3558 | 4036 | 4506 | 5006 | 5554 | 6006 | 6467 | 6764 |
| 1150 | 1527 | 2090 | 2455 | 2849 | 3203 | 3573 | 4052 | 4507 | 5021 | 5556 | 6026 | 6469 | 6769 |
| 1154 | 1534 | 2107 | 2457 | 2852 | 3214 | 3628 | 4053 | 4518 | 5027 | 5566 | 6029 | 6507 | 6774 |
| 1156 | 1539 | 2148 | 2485 | 2866 | 3238 | 3633 | 4074 | 4546 | 5030 | 5573 | 6039 | 6510 | 6785 |
| 1165 | 1554 | 2155 | 2486 | 2870 | 3251 | 3649 | 4081 | 4564 | 5046 | 5574 | 6048 | 6515 | 6806 |
| 1169 | 1589 | 2209 | 2501 | 2882 | 3273 | 3694 | 4088 | 4589 | 5052 | 5579 | 6065 | 6533 | 6811 |
| 1181 | 1602 | 2212 | 2522 | 2885 | 3302 | 3695 | 4126 | 4604 | 5053 | 5580 | 6074 | 6540 | 6828 |
| 1183 | 1650 | 2213 | 2527 | 2895 | 3303 | 3699 | 4148 | 4628 | 5054 | 5585 | 6084 | 6545 | 6866 |
| 1187 | 1669 | 2215 | 2553 | 2902 | 3305 | 3712 | 4170 | 4655 | 5056 | 5594 | 6096 | 6546 | 6894 |
| 1198 | 1673 | 2223 | 2554 | 2912 | 3327 | 3729 | 4173 | 4662 | 5057 | 5604 | 6097 | 6560 | 6898 |
| 1207 | 1701 | 2226 | 2567 | 2922 | 3333 | 3731 | 4175 | 4704 | 5058 | 5610 | 6100 | 6563 | 6900 |
| 1225 | 1706 | 2232 | 2569 | 2925 | 3337 | 3735 | 4189 | 4714 | 5059 | 5632 | 6101 | 6604 | 6905 |
| 1235 | 1741 | 2242 | 2573 | 2936 | 3340 | 3738 | 4208 | 4724 | 5088 | 5634 | 6106 | 6606 | 6909 |
| 1250 | 1742 | 2247 | 2583 | 2946 | 3349 | 3739 | 4212 | 4726 | 5116 | 5653 | 6136 | 6609 | 6916 |
| 1252 | 1749 | 2263 | 2585 | 2970 | 3356 | 3749 | 4222 | 4743 | 5136 | 5655 | 6146 | 6626 | 6939 |
| 1260 | 1761 | 2269 | 2595 | 2982 | 3357 | 3760 | 4283 | 4746 | 5195 | 5727 | 6147 | 6627 | 6954 |
| 1261 | 1767 | 2274 | 2598 | 2992 | 3359 | 3768 | 4304 | 4774 | 5224 | 5731 | 6159 | 6631 | 6964 |
| 1267 | 1782 | 2276 | 2602 | 2997 | 3366 | 3776 | 4307 | 4784 | 5249 | 5752 | 6169 | 6642 | 6965 |
| 1268 | 1798 | 2278 | 2603 | 3000 | 3371 | 3796 | 4319 | 4788 | 5268 | 5768 | 6199 | 6643 | 6985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# पैशाचा पूर आणि सत्तेचा गैरवापर

पान १ वरून

लागल्यानंतर त्यासंबंधीची अस्वस्थता संपूर्ण राज्यात दिसत आहे.

निवडणुकीत झालेली अनियमितता पाहून बाबा आढाव यांनी उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत झालेला सत्तेचा गैरवापर आणि पैशांचा महापूर याआधी कधीही पाहायला मिळाला नव्हता. स्थानिक निवडणुकांत अशा घटना ऐकायला मिळतात. पण राज्याच्या निवडणुकीत असे चित्र कधी दिसले नव्हते. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

बाबा आढाव यांच्या उपोषणाला पाठिंबा देताना ते म्हणाले की, बाबा आढाव यांच्या उपोषणाने एक प्रकारचा दिलासा सामान्य माणसांना मिळत आहे. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून त्यांनी ही भूमिका घेतली आहे. पण त्यांनी एकट्यानेच भूमिका घेणे पुरेसे नाही. यासाठी जनतेचाही उठाव व्हायला हवा. अन्यथा संसदीय लोकशाही उद्ध्वस्त होईल. देशाची सूत्रे ज्यांच्या हाती आहेत, त्यांना याची काही पडलेली नाही. संसदेत आम्ही मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला तर आम्हाला बोलू देत नाहीत. रोज सकाळी ११ वाजता विरोधी पक्षनेते आपले म्हणणे मांडण्यासाठी बोलायला उभे राहतात. पण त्यांना बोलू दिले जात नाही. मागील सहा दिवसांत संसदेत देशाच्या एकाही प्रश्नाची चर्चा होऊ शकलेली नाही. याचाच अर्थ देशाच्या संसदीय लोकशाहीवर ते (सत्ताधारी) आघात करत आहेत. यासाठी आम्हाला आता लोकांमध्ये जाऊन जागृती करावी लागेल.

आढाव यांच्या भेटीवेळी अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. बाबा आढाव यांनी मांडलेल्या काही गोष्टी निवडणूक आयोगाशी संबंधित आहेत. तर काही मुद्दे सर्वोच्च न्यायालयाशी संबंधित आहेत. आम्ही निवडणूक आयोगाला लक्षात आणून दिलेले मुद्दे त्यांनी मान्य केले होते. मागील लोकसभा निवडणुकीत आमच्या जागा कमी झाल्या होत्या. त्यावेळी आम्ही कोणी ईव्हीएमबद्दल बोललो नाही. पण विधानसभेत आम्हाला यश मिळाल्यावर विरोधक ईव्हीएमबद्दल प्रश्न उपस्थित करत आहेत. आता ५ महिन्यांत जनतेचा कौल बदलला याला आम्ही काय करणार?

उद्धव ठाकरे म्हणाले की, जिंकलेले आणि हरलेले दोघेही येथे येत आहेत. याचा अर्थ जिंकलेल्यांनाही निकालावर विश्वास नाही. वनवा पेटायला ठिणगी लागते ती या आंदोलनाच्या माध्यमातून पडली आहे. या निवडणुकीमध्ये पैशांचा अमाप वापर झाला. ते विनोद तावडे यांच्या व्हिडिओतून स्पष्ट झाले. एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना म्हणाले की, एवढे बहुमत मिळाले तरी यांना आनंद झालेला दिसत नाही. सगळ्यांचे चेहरे का पडलेले आहेत. बहुमत मिळाल्यावरही काही जणांना शेतात पुजा-अर्चा करायला का जावे लागते. त्यांनी राजभवनात जायला हवे.

# ईव्हीएमच्या निकालात गडबड आहे का?

पान १ वरून

मंगळवार ३ डिसेंबर रोजी बॅलेट पेपरने मार्कडवाडी गावात मतदान होणार आहे. सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होऊन लगेचच मतमोजणी केली जाणार आहे. या मतमोजणीत सातपुतेंऐवजी उत्तम जानकर यांना जर गावात आघाडी मिळाल्याचे सिद्ध झाले तर ईव्हीएम मशीनबाबत संपूर्ण महाराष्ट्रात व्यक्त होणारा संशय अधिकच बळावणार आहे. यासाठीच हे मतदान अतिशय महत्त्वाचे आहे.

गावाने माळशिरस तहसीलदार यांना पत्र पाठवून या मतदानाच्या दिवशी सरकारी कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे अशी विनंती केली आहे. मतमोजणीसाठीही शासकीय कर्मचारी उपलब्ध करावे, अशीही विनंती करण्यात आलेली आहे. मात्र त्यांची ही मागणी अमान्य केली आहे. महाराष्ट्रातील २२ आमदारांनी मतमोजणीबाबत निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार केली आहे. त्यासाठी त्यांनी आवश्यक असलेले लाखो रुपये भरले आहेत. मात्र निवडणूक आयोग पूर्ण मतांची फेरमोजणी करीत नाही. नियमानुसार निवडणूक आयोग केवळ ५ मतदान केंद्रावरील मतांची फेरमोजणी करते. त्यामुळे त्यांच्या निकालानंतरही संशय कायम राहू शकतो.

मार्कडवाडीच्या प्रयोगामुळे मात्र ईव्हीएमचे सत्य असत्य सिद्ध होईल अशी आशा आहे. महाराष्ट्रात मतदान झाल्यानंतर एका गावाने स्वतंत्रपणे मतदानाबाबत खात्री करण्यासाठी पुन्हा मतदान केल्याची ही पहिलीच ऐतिहासिक घटना ठरणार आहे.

## ५ डिसेंबरला शपथविधी

पान १ वरून

आजही उघड झाला नाही. महायुतीतील कोणत्याही नेत्याने याबद्दल प्रतिक्रिया दिली नाही. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाबाबतची उत्सुकता अजूनही कायम आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना १०५ डिग्रीपर्यंत ताप आला असून डॉक्टरांच्या पथकाने त्यांची तपासणी केली. डॉक्टरांनी त्यांना सलाईन लावण्याची सूचना केली आहे. त्यामुळे आज दिवसभर ते घराबाहेर पडले नाहीत. दिपक केसरकर यांनी भेटायला आले होते. परंतु तब्येत ठीक नसल्याने शिंदे त्यांना भेटले नाहीत. त्यामुळे केसरकर मुंबईला परत गेले.

# सेबी: कार्य आणि बदलत्या अपेक्षा

**प्रत्येक देशात वेगवेगळे व्यवसाय, उद्योग आणि संस्थांचे नियमन व त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्था असतात. जसे भारतातील संपूर्ण बँकिंग व्यवसायावर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया काम करते. सगळ्या इन्शुरन्स कंपन्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी इन्शुरन्स रेग्युलेशन डेव्हलपमेंट अथोरिटी म्हणजेच आय.आर.डी.ए. कार्यरत आहे. त्याचप्रमाणे भारतीय शेअर बाजार नियंत्रित करण्यासाठी सरकारने स्थापन केलेली संस्था म्हणजे सिक्युरिटीज एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ही कायदेशीर अस्तित्व असलेली आणि सदैव कार्यरत असलेली बाजार नियामक संस्था आहे. शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे आणि अधिकाधिक सुदृढ बाजार तयार करणे हे सेबीचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



● कौस्तुभ जोशी

**सेबीची स्थापना...**

१९९१ पूर्वी भारतीय शेअर बाजार कोणाच्याच नियंत्रणाखाली नसायचा म्हणजेच शेअर बाजारात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींवर नियंत्रण / नियमन करण्यासाठी सरकारची कोणतीही संस्था अस्तित्वात नव्हती. भारतात नवीन आर्थिक धोरणे जरी १९९१ मध्ये आली तरी त्या आधीपासूनच भारतीय शेअर बाजाराला एका नियंत्रकाची गरज होतीच. १९८८ या वर्षात नियामक म्हणून सेबी या संस्थेची स्थापना करण्यात आली.

९० च्या दशकात हर्षद मेहता शेअर बाजार घोटाळा प्रकरणानंतर बाजारातील अनियमितता दूर करणे, शेअर्सच्या खरेदी विक्रीत नसलेली पारदर्शकता आणणे यासाठी एका तटस्थ संस्थेची गरज जाणवू लागली. त्यावेळी सेबी सारख्या नियामकाची स्थापना होणे महत्त्वाचे ठरले.

शेअर बाजार सुरळीतपणे काम करतो की नाही हे पाहाणे सेबीचे मुख्य काम आहे. त्याचप्रमाणे बाजारात सशक्त स्पर्धा निर्माण करणे, शेअर बाजारातील खरेदी विक्रीचे व्यवहार पारदर्शकपणे होतात की नाही ते बघणे, शेअर बाजारात होणाऱ्या संभाव्य घोटाळ्यांचे अंदाज बांधून ते घडू नयेत यासाठी कार्यरत असणे हे सेबीचे काम आहे.

**सेबीचे प्रमुख कार्य...**

बाजारातील उलाढाल संपूर्णपणे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून व्हावी, म्हणजेच आपण ज्याला आज डिमॅट अकाउंट असे म्हणतो ती व्यवस्था अस्तित्वात यावी, शेअरची खरेदी विक्री केली की दोन दिवसात तो व्यवहार पूर्ण व्हावा, 'टी प्लस टू सेटलमेंट' या सेबीने स्थापन झाल्यावर सुरुवातीच्या काळात घडवून आणलेल्या मोठ्या सुधारणा आहेत. शेअर बाजारामध्ये सूचीबद्ध म्हणजेच 'लिस्टेड' कंपन्यांचे व्यवहार आखून दिलेल्या नियमाप्रमाणे चालतात की नाही? शेअर बाजारात व्यवहार करणाऱ्या एखाद्या गुंतवणूकदाराला फसवले जात नाही ना? यावर सेबीने लक्ष ठेवणे अपेक्षित आहे. कंपनीच नव्हे तर शेअर बाजार आणि कंपन्या यांच्यातील दुवा असलेला ब्रोकर त्याचे काम व्यवस्थित करतो की नाही यावर लक्ष ठेवणे हे सेबीचे प्रमुख काम आहे.

**सेबी म्हणजे न्यायालय नव्हे!**

सेबी ही नियंत्रक व नियामक स्वरूपाची संस्था असल्याने सेबीला न्यायनिवाडा करण्याचा थेट अधिकार नाही मात्र शेअर मार्केटच्या संदर्भात आर्थिक घोटाळा घडून आला, व्यवहारामध्ये पारदर्शकता नसली, गुंतवणूकदाराला नाडण्याचा प्रकार झाला तर सेबी आपल्या अखत्यारीत कारवाई नक्की करू शकते.

गुंतवणूकदाराला आवश्यक ती सर्व माहिती मिळण्यासाठी कंपन्यांनी कार्यरत राहावे यासाठी सेबीने यंत्रणा तयार केली आहे. जर नियमानुसार शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदाराला आवश्यक ती माहिती कंपन्यांनी पुरवली नाही तर त्याविरुद्ध सेबी कारवाई करते.

**इनसाईडर ट्रेडिंग...**

शेअर बाजारात माहिती आणि बातमी याला खूपच महत्त्व आहे. एखाद्या कंपनीने घेतलेले निर्णय किंवा कंपनीचा भविष्यातील आराखडा याविषयी कुणाला आधीच माहिती असेल आणि जर ती माहिती वापरून त्याने गुंतवणूक केली तर तो गुन्हा आहे. कृत्रिमरीत्या शेअरची किंमत फुगवली गेली किंवा एखाद्या कंपनीचे बाजारमूल्य (मार्केट व्हॅल्यू) त्या कंपनीच्या नफ्या–तोट्याशी मिळते जुळते नसेल तर सेबी कंपनीवर कारवाई करू शकते.

**सेबी आणि म्युच्युअल फंड**

बाजारातील सर्वात मोठा गुंतवणूकदार हा आता म्युच्युअल फंड उद्योग आहे. दर महिन्याला वीस हजार कोटी रुपये एवढी प्रचंड मोठी गुंतवणूक म्युच्युअल फंडातर्फे शेअर बाजारात केली जाते. हे सर्वसामान्य माणसांचे पैसे असतात. अशावेळी म्युच्युअल फंडांनी आपल्या व्यवसायात अधिकाधिक पारदर्शकता तसेच शिस्तबद्धता आणावी यासाठी सेबीने अनेक रचनात्मक बदल केले आहेत. म्युच्युअल फंडाच्या विविध योजनांना आकर्षक नावे देऊन व डिव्हिडंड देण्याचे आमिष दाखवून फंडविक्री करण्यास बंदी आहे. फंड योजना नेमक्या कशात गुंतवणूक करतात याची माहिती गुंतवणूकदाराला व्हावी हे सेबीच्या प्रयत्नामुळे शक्य झाले आहे. प्रत्येक म्युच्युअल फंड कंपनीला त्यांनी केलेल्या गुंतवणुकीचे हिशोब व त्या संबंधातील सर्व माहिती द्यावी लागते. गुंतवणूकदारांना गुंतवणुकीतील जोखीम /रिस्क समजावी यासाठी सोप्या भाषेत व चिन्हाच्या साहाय्याने रिस्क कशी बघावी हे समजावून दिले आहे.

भारतीय शेअर बाजार १९९० नंतर गुंतवणूकदारांसाठी अधिक सोयीस्कर ठरावा म्हणून जे बदल केले गेले त्यात सेबीचा महत्त्वाचा वाटा होता. विदेशी गुंतवणूकदारांनी भारतात गुंतवणूक करावी यासाठी आकर्षक वातावरण निर्माण करणे हे काम सेबीने घडवून आणले. परदेशी कंपन्या, भारतातील खाजगी व सरकारी कंपन्यांमध्ये कशी गुंतवणूक करतात यावर सेबीचे लक्ष असते.

**क्रेडिट रेटिंग एजन्सी आणि सेबी**

प्रत्येक क्रेडिट रेटिंग कंपनीला सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करावे लागते. क्रेडिट रेटिंग म्हणजेच मानांकन ठरवणारी कंपनी. एखाद्या कंपनीला आपल्या सिक्युरिटीचे रेटिंग करून घ्यायचे असेल तर त्या क्रेडिटेशन एजन्सीला काम देतात मात्र त्यांनी चुकीचे मानांकन केले तर सेबी दंड ठोठावते.

शेअर बाजारात गुंतवणूक करणारे भारतीय गुंतवणूकदार, रोख्यांमध्ये गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार, क्रेडिट रेटिंग एजन्सी, परदेशी गुंतवणूकदार, वायदे बाजार, कमोडिटी मार्केट यांच्या नियमनाची आणि देखरेखीची जबाबदारी देखील सेबीकडेच आहे.

**सेबी आणि अलीकडील काळातील आरोप**

अलीकडील काळात हिंडेनबर्ग संस्थेच्या अहवालानंतर सेबीच्या कार्यक्षमतेवर मर्यादा आहेत हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. सेबीच्या कार्याला कोणत्याही मर्यादा नाहीत पण कारवाई करण्याच्या असलेल्या अधिकार क्षेत्राला मात्र मर्यादा आहे हे दुर्दैव आहे. यामुळेच सेबी सर्व कंपन्यांच्या संदर्भात एकसारखेच मानदंड लावत नाही असा आरोप केला जातो. गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण व्हावे यासाठी सेबीने उद्योगसंस्था किती मोठी आहे याचा विचार न करता कारवाई करायला हवी असे अर्थतज्ज्ञांच्या एका गटाचे म्हणणे आहे. भारतातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या अदानी उद्योग समूहाच्या संदर्भात परदेशी वित्तसंस्था आणि नियमकांनी आरोप केल्यामुळे तसेच संशोधन अहवाल प्रसिद्ध केल्यामुळे सेबी याबाबतीत आता काय करणार हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या दरम्यान छोट्या आणि मध्यम उद्योगांना भांडवली बाजारात येणे सोपे व्हावे यासाठी एसएमई आयपीओ ही प्रक्रिया आणखी सोपी करण्याकडे सेबीचे सतत लक्ष आहे.

*(लेखक अर्थ अभ्यासक आणि शेअर बाजार विश्लेषक आहेत.)*

# जुने पॅन कार्ड बंद होणार
# नवे पॅन २.० येणार

**आर्थिक व्यवहारांसाठी तसेच प्राप्तिकर विवरणपत्र (आयटीआर रिटर्न) भरण्यासाठी आवश्यक असलेल्या दस्तऐवजांपैकी एक महत्त्वाचे दस्तऐवज म्हणजे आपले पॅन कार्ड. केंद्र सरकारने पॅन कार्डसंबंधी एक नवा आणि मोठा बदल केला आहे. सरकार आता पॅन २.० लागू करण्याच्या तयारीत आहे. आर्थिक व्यवहार विषयक समितीने (CCEA) आयकर विभागासाठी पॅन २.० प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. प्राप्तिकर विभागाच्या या १,४३५ कोटींच्या प्रस्तावाला हिरवा कंदील मिळाल्याची घोषणा नुकतीच करण्यात आली. या नव्या प्रकल्पानुसार आता नागरिकांचे जुने पॅन कार्ड जाऊन नवे अधिक 'अपडेटेड व्हर्जन'चे पॅन कार्ड नागरिकांना मिळणार आहे.**




**पॅन २.० म्हणजे काय?**

पॅन २.० प्रकल्प हा एक ई–गव्हर्नन्स प्रकल्प आहे. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून पॅन सेवांचा दर्जा वाढवणे हा प्रकल्पाचा उद्देश आहे. पॅन सेवेसाठी सध्या वापरण्यात येत असलेले सॉफ्टवेअर १०–१५ वर्षे जुने असल्याने त्यात सुरक्षेसंबंधीच्या काही त्रुटी होत्या, त्यामुळे फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. म्हणूनच एक नवे पोर्टल तयार करून सोबतच यासाठी नवे तंत्रज्ञान आणले जाईल असा निर्णय घेण्यात आला. पॅन २.० चा मुख्य उद्देश डिजिटल सुरक्षा मजबूत करण्याचा आहे जेणेकरून ऑनलाइन फसवणूक आणि डेटा चोरीची शक्यता कमी होईल. याशिवाय करदात्यांना सुलभ आणि जलद डिजिटल सेवा पुरवण्याचे उद्दिष्टदेखील या प्रकल्पाचा महत्त्वाचा भाग आहे. याचा वापर करून कर भरणे किंवा कंपनीची नोंदणी करणे किंवा बँकेत खाते उघडणे सामान्यांसाठी सोपे होणार आहे.

**नवे काय असणार?**

पॅन २.० हे पॅन कार्डचे अद्ययावत रूप असणार आहे. या प्रकल्पामुळे प्रत्येक पॅन कार्डवर आता क्यूआर कोडचा अंतर्भाव केला जाणार आहे. पॅन २.० मधील क्यूआर कोडमुळे तुमचे पॅन कार्ड अधिक सुरक्षित राहील, हॅकर्सना सहजासहजी त्याची बनावट कॉपी बनवता येणार नाही. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर त्या व्यक्तीची सगळी माहिती एकाचवेळी उपलब्ध असेल. क्यूआर कोडमध्ये नाव, जन्मतारीख, पॅन क्रमांक आणि इतर तपशील विशेष सुरक्षा वैशिष्ट्यांमुळे 'एनक्रिप्टेड' स्वरूपात असतील, ज्यामुळे ही माहिती अधिक सुरक्षित राहील आणि पॅन कार्ड व्हेरिफिकेशन करणेही सोपे जाईल.

### पॅन २.० ची प्रमुख वैशिष्ट्ये

- नागरिकांना पॅन संबंधित सर्व सेवांसाठी एकच पोर्टल उपलब्ध झाल्याने सेवा सुटसुटीत होईल.
- पर्यावरण–स्नेही कागदविरहित प्रक्रियांवर भर देण्यात येईल.
- वाढीव सुरक्षा उपायांच्या माध्यमातून वापरकर्त्यांच्या खासगी माहितीचे संरक्षण होईल.
- वापरकर्त्यांच्या समस्या आणि प्रश्नांचे निरसन करण्यासाठी एक स्वतंत्र कॉल सेंटर असेल.
- या प्रकल्पामुळे वापरकर्त्यांना पॅन/टॅनसाठी ऑनलाइन अर्ज करणे, त्यांचे तपशील अद्ययावत करणे आणि पॅन माहिती डिजिटल पद्धतीने प्रमाणित करणे सोपे होईल.

**जुन्या पॅन कार्डचे काय होणार?**

सरकारच्या पॅन २.० प्रकल्पांतर्गत नवे क्यूआर कोड असलेले पॅन कार्ड येणार असल्याने आता जुन्या पॅन कार्डचे नेमके काय होणार? जुना पॅन क्रमांक बदलणार का? नव्या पॅन कार्डसाठी पैसे भरावे लागणार का? असे बरेच प्रश्न अनेकांना पडले आहेत. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, तुमच्याकडे सध्या असणारे पॅन कार्ड हे नवे पॅन कार्ड २.० आल्यावरही वैध राहणार आहे. पॅन कार्ड २.० मध्ये कोणत्याही व्यक्तीचा पॅन क्रमांक बदलणार नाही. शिवाय सगळ्यांना नव्या अद्ययावत कार्डसाठी अर्ज करणे अनिवार्य नाही. परंतु ज्यांना अद्ययावत पॅन कार्ड हवे असेल ती मंडळी पॅन अपग्रेड करू शकतील. क्यूआर कोड असलेले हे नवे पॅन कार्ड नागरिकांना विनामूल्य मिळेल. आपल्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर ई–पॅन कार्ड पाठवले जाईल. जर प्रत्यक्ष हातात कार्ड पाहिजे असेल तर अर्जदाराला ५० रुपये भरावे लागतील.

# १३ वर्षांचा आयपीएल कोट्यधीश!




**२०२५ च्या आयपीएल हंगामासाठीचा लिलाव! एकेका खेळाडूच्या नावाचा पुकारा होत होता. त्याच्यावरील बोली लावण्यासाठीची सुरुवातीची किंमत पुकारणारी युवती आणि त्या मागोमाग स्क्रीनवर दिसणारी त्या खेळाडूची माहिती व रेकॉर्ड... समोर दहा संघांची व्यवस्थापकीय मंडळी आणि पुकारा झाला वैभव सूर्यवंशीच्या नावाचा... वय फक्त १३ वर्षे...डावखुरा फलंदाज व डाव्या हाताने फिरकी गोलंदाजी करणारा बिहारचा मुलगा... सुरुवातीची किंमत ३० लाख रुपये आणि मग वैभवला आपल्या संघात घेण्यासाठी बोली सुरू झाली. राजस्थान रॉयल्स व दिल्ली कॅपिटल हे दोन संघ वैभवला आपल्या संघात घेण्यासाठी उत्सुक होते. बोली सुरू झाली... ३०लाख..३५ लाख. ४०.. लाख... बोली पाच पाच लाखांनी वाढत गेली आणि अखेर १ कोटी १० लाखांवर थांबली. अंतिम बोली राजस्थान संघाची होती. आणि अशाप्रकारे आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच तेरा वर्षाचा मुलगा आयपीएल कोट्यधीश झाला!**

## वैभवची ऐतिहासिक निवड...

सौदी अरेबियातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर असलेल्या जेद्दाह येथे झालेल्या आयपीएल मेगा लिलावाच्या दुसऱ्या आणि शेवटच्या दिवशी म्हणजेच २५ नोव्हेंबर २०२४ रोजी तेरा वर्षे व आठ महिन्यांचा वैभव सूर्यवंशी याला राजस्थान रॉयल संघाने १.१० कोटी रुपयांना विकत घेतले आणि वैभव आयपीएलच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू बनला.

आयपीएलचा लिलाव सुरू होण्यापूर्वी राजस्थान रॉयल्सने वैभवला नागपूरला चाचणीसाठी बोलावले होते. संघाचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड तेथे हजर होते. त्यांनी वैभवला सामन्याची स्थिती सांगितली. शेवटचे षटक बाकी आहे आणि संघाला १७ धावांची आवश्यकता आहे. चाचणीचे षटक सुरू झाले आणि वैभवने सहा चेंडूत तीन षटकार मारून आपल्याला दिलेली कामगिरी पूर्ण केली. चाचणीच्या वेळी त्याने एकूण आठ षटकार आणि चार चौकार लगावले. राठोड सरांपासून सर्वच उपस्थित प्रभावित झाले. खरंतर त्याचवेळी वैभवने राजस्थान रॉयल संघात आपले स्थान निश्चित केले होते, २५ नोव्हेंबरच्या लिलावात त्यावर शिक्कामोर्तब झाले.




### वैभवचा क्रिकेट प्रवास...

वैभवचा क्रिकेट प्रवास वयाच्या चौथ्या वर्षापासून सुरू झाला. वैभवच्या वडिलांना त्याची क्रिकेटबद्दलची आवड लक्षात आली. वैभवचे वडील संजीव सूर्यवंशी शेतकरी होते. आपल्या छोट्याशा जमिनीच्या तुकड्यावर आपल्या कुटुंबाची गुजराण करत होते परंतु त्यांनी वैभवमधील क्रिकेटचे गुण हेरले आणि आपल्या परिस्थितीची पर्वा न करता वैभवला क्रिकेटपटू बनवण्याचे त्यांनी ठरवले. त्यांनी घराच्या मागच्या अंगणात एक लहान सराव क्षेत्र तयार केले. वैभव प्रतिभाशाली होताच, तो मनापासून या घरच्या खेळपट्टीवर सराव करू लागला. नऊ वर्षांचा झाल्यावर त्याच्या वडिलांनी त्याला समस्तीपूर येथील क्रिकेट अकादमीत दाखल केले आणि त्यानंतर वैभवने मागे वळून पाहिलेच नाही.

### वर्ल्ड कप आणि निराशा...

अवघ्या बाराव्या वर्षी त्याला विनू मंकड ट्रॉफीमध्ये बिहार तर्फे खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने या संधीचे सोने केले. त्याने पाच सामन्यांमध्ये ४०० धावा केल्या. काही महिन्यानंतर म्हणजे नोव्हेंबर २०२३ मध्ये आंध्रप्रदेश येथे झालेल्या चतुर्भुज मालिकेसाठी त्याला भारताच्या १९ वर्षाखालील संघात स्थान मिळाले. पुढे २०२४ च्या वर्ल्ड कपसाठी आयसीसीच्या १९ वर्षाखालील अ संघात निवड होण्याच्या दृष्टीने निवड समिती निरीक्षण करत असलेल्या बांगलादेश व इंग्लंडविरुद्धच्या १९ वर्षाखालील संघात वैभवला स्थान मिळाले असले तरी त्याची वर्ल्ड कपसाठी निवड मात्र होऊ शकली नाही.

अर्थात वैभव निराश झाला नाही. त्याने २३ वर्षाखालील संघ निवडीच्या कॅम्पमध्ये सर्वांना प्रभावित केले आणि त्याची निवड बिहारच्या रणजी ट्रॉफी संघासाठी झाली. २०२४ मध्ये तो एलिट ग्रुप बी मध्ये मुंबई विरुद्ध बिहार या पाटण्याला झालेल्या सामन्यात खेळला आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये खेळणारा तो चौथा सर्वात तरुण खेळाडू बनला. मुंबई विरुद्धच्या सामन्यानंतर या वर्षात तो आणखी चार रणजी ट्रॉफी सामने खेळला. सध्या तो बिहारतर्फे सय्यद मुस्ताक अली ट्रॉफी खेळत आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये त्याने राजस्थान संघातून टी–२० सामन्यात पदार्पण केले होते.

### आयपीएलसाठी करारबद्ध

वैभवचे नाव सर्वत्र गाजू लागले ते त्याच्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या १९ वर्षाखालील सामन्यातील झंझावाती शतकामुळे! त्याने या सामन्यात फक्त ५८ चेंडूत १०४ धावा काढल्या होत्या. तो त्यावेळी फक्त १३ वर्षे व १८७ दिवसांचा होता. आंतरराष्ट्रीय युवा क्रिकेटमध्ये शतक झळकवणारा तो सर्वात लहान खेळाडू बनला. यापूर्वीचा विक्रम बांगलादेशचा कप्तान नजमूल हसन शांतो याच्या नावे होता. या शतकानंतर दोन महिन्यांनी, वयाच्या १३ वर्षे २४३ दिवसांनी तो आयपीएलसाठी करारबद्ध झाला!

बिहारमधील समस्तीपूर शहरापासून १५ किलोमीटर अंतरावरील मोतीपूर गावी असलेल्या त्याच्या वडिलांना जेव्हा ही बातमी कळली तेव्हा त्याचे वडील संजीव सूर्यवंशींच्या तोंडून काही काळ शब्दच फुटेनात. मग ते म्हणाले वो अब सिर्फ हमारा बिटूवा नही, पुरा बिहार का बिटूवा है!

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

# नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# वेगवान वाहन उद्योगापुढचे अडथळे

**देशातील** वाढती लोकसंख्या आणि त्याच प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या आणि या वाहनांसाठी अपुरे पडणारे रस्ते, जागा, या सर्वांचे प्रमाण इतक्या व्यस्त स्वरूपाचे आहे की, एकूण वाहन उद्योगाबाबतच काही निश्चित निर्णय घेण्याची वेळ येऊ शकते. भारतातला वाहन उद्योग इतर उद्योगांपेक्षा प्रचंड वेगाने वाढतो आहे. जपानलाही मागे टाकून जगातला तिसरा मोठा वाहन उद्योग म्हणून भारताला स्थान प्राप्त होते आहे. दरवर्षी जवळपास २२ लाख कोटींची उलाढाल होत असलेल्या या वाहन उद्योगाला तेवढ्याच किमतीचेही इंधन पुरवावे लागते. हे सगळे इंधन भारतात तयार होत नसल्याने त्याची आयात करताना सोसावा लागणारा तोटादेखील मोठा चिंतेचा विषय ठरतो आहे. वाहन उद्योगाचा विस्तार हा अर्थव्यवस्थेला, रोजगाराला, आणि काही प्रमाणात पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाला जरी चालना देत असला तरीसुद्धा ज्या वेगाने वाहनांचे उत्पादन होते आहे, त्याप्रमाणात वाहनांसाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधांची पूर्तता होऊ शकत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. हा उद्योग उत्पादन किंवा आर्थिक उलाढालीच्याबाबतीत टॉप गिअरवर जरी असला तरी सोयीसुविधांचे मोठ्या स्पीड ब्रेकर्सला त्याला सामना करावा लागतो. म्हणूनच जगातल्या तिसऱ्या क्रमांकावर पोहोचलेला भारताचा वाहन त्याच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांचा किती गांभिर्याने विचार करतो आहे हे पाहाणेदेखील तितकेच महत्त्वाचे ठरते आहे. केंद्रीय वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांनी स्वतःच दिल्लीतल्या एका कार्यक्रमात बोलताना हे कबूल केले की देशातील एकूण प्रदूषणामध्ये चाळीस टक्के प्रदूषण हे वाहनांमुळे निर्माण होते मग अशावेळी या वाहन उद्योगाचा विस्तार होत असताना त्याच्या वेगवेगळ्या परिणामांचा गांभिर्याने विचार करणे क्रमप्राप्त ठरते. ही गोष्ट निश्चितच महत्त्वाची आहे की, आज देशाच्या जवळपास सगळ्या राज्यांमध्ये वाहन उद्योगाने आपले पाय रोवले आहेत. त्या त्या ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देत असतानाच त्या त्या राज्यांच्या अर्थव्यवस्थेलासुद्धा या उद्योगाने हातभार लावलेला आहे.

**चाळीस टक्के प्रदूषण**

अगदी आपल्या महाराष्ट्राचे जरी उदाहरण घेतले तरी त्याची गंभीरता लक्षात येते. जगातील सर्व मोठ्या वाहन कंपन्यांचे कारखाने आज महाराष्ट्रात आहेत. वाहन उद्योगाला आवश्यक असे पोषक वातावरण निर्माण करून देण्याचे काम महाराष्ट्र सरकार करीत असते. शिवाय दिल्लीपाठोपाठ सर्वाधिक वाहनांची विक्रीदेखील महाराष्ट्रात होते आहे. अगदी त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक, समृद्धीमहामार्ग हे तीन मार्ग वगळले तर एकूणच महाराष्ट्रातील रस्त्यांची काय दुर्दशा आहे हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. केंद्रीय वाहतुक मंत्री हे महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतात. आज त्यांच्या कार्यक्षमतेचे अफाट कौतुक होत असते. विशेषतः देशाच्या अनेक भागांमध्ये त्यांनी रस्ते विकासाचा धडाकेबाज कार्यक्रम राबवला आणि त्याचे अनेक फायदे त्या त्या राज्यांना झालेले आहेत. विशेषतः उत्तर भारत मग अगदी जम्मू-काश्मीर, हिमाचल, उत्तराखंड या पहाडी प्रदेशांमध्येसुद्धा रस्त्यांची भक्कम निर्मिती होते आहे. त्या तुलनेत महाराष्ट्राच्या रस्ते निर्मितीचा कार्यक्रम बराच रखडला आहे हे नाकारता येणार नाही. समृद्धी महामार्गाचे श्रेय घेत असतानाच गेली पंधरा वर्षे लांबलेला मुंबई-गोवा महामार्ग सतत अडखळत आणि धडपडत असलेला मुंबई-नाशिक मार्ग एवढेच नव्हे तर मुंबई-अहमदाबाद मार्गाचीसुद्धा योग्य ती देखभाल ठेवली गेलेली नाही. पुणे, नाशिक रस्त्याचे नेहमीप्रमाणेच तीन तेरा वाजलेले असतात. पण या सगळ्या महामार्गांवर वाहनांची तुडुंब गर्दी असते. मुंबई हे आता केवळ माणसांच्या गर्दीचे शहर राहिलेले नाही तर प्रचंड वाहन संख्येने रहदारीची कोंडी करणारे शहरही राहिलेले आहे. याचा अर्थ वाहन उद्योगाचा विस्तार म्हणजेच वाहनांची तितक्याच वेगाने होणारी निर्मिती लक्षात घेतली तर या वाहनांसाठी आज पुरेसे रस्ते नाहीत. देशाच्या जवळपास सगळ्या महामार्गांमध्ये वाहने उभी करण्यासाठी पुरेशी जागा नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या वाहनांमधून बाहेर पडणारा प्रदूषित वायू रोखण्याच्या दिशेने कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नाही.

**अपघातांमध्ये जगात एक नंबर**

आज सरकारने जरी नैसर्गिक वायूवर किंवा विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन दिलेले असले तरी प्रदूषणाची ही पातळी कमी होण्यासाठी पुढची अजून वीस वर्षे लागू शकतील अशी आज परिस्थिती आहे. यासोबतच येणारी प्रमुख समस्या म्हणजे सरकारी कायद्याप्रमाणेच पंधरा वर्षे पूर्ण झालेली वाहने ही भंगारात काढावी लागतात. आज देशभरात जवळपास एक कोटीच्यावर वाहने भंगाराच्या स्वरूपात पडून आहेत. त्यांची विल्हेवाट कशी लावायची याबद्दलचे धोरण जरी तयार झालेले असले तरी त्याच्या अंमलबजावणीमध्ये प्रचंड मोठी तफावत आहे. ही वाहने ठेवायची कुठे आणि या भंगार वाहनांवरची प्रक्रिया कशा स्वरूपाची असेल याबद्दलही आज निश्चित असे कोणतेही उपाय अंमलात आलेले दिसत नाहीत. स्वाभाविकपणे हा वाहनउद्योग विस्तारतो आहे. म्हणजेच वाहनांची संख्या वाढते आहे. त्याचप्रमाणामध्ये देशात अपघातांची संख्यादेखील कमी झालेली नाही. दरवर्षी वाहन अपघातांमध्ये दीड लाख लोकांचे बळी जातात. हा आकडा धक्कादायक आहे. सरकारला वाहन उद्योग जगात तिसऱ्या क्रमांकावर न्यायचा असेल तर त्याचवेळी याच वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांमध्ये जगात भारत पहिल्या क्रमांकावर आहे हेदेखील विसरून चालणार नाही. या सर्व परिस्थितीचा विचार केला तर वाहन उद्योगाच्या विस्ताराला प्राधान्य देत लक्ष असताना त्यातून निर्माण होत असलेल्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. वेगवान वाहन उद्योगापुढचे हे अडथळे दूर करण्यासाठी तितक्याच मोठ्या प्रयत्नांची आवश्यकता आहे.


**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**आज जे तुमचं आहे ते काल दुसऱ्या कोणाचं तरी होतं आणि उद्या दुसऱ्या कोणाचं तरी असेल. परिवर्तन हाच सृष्टीचा नियम आहे.**

**पंचांग**

**रविवार, १ डिसेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**
**कार्तिक अमावास्या**
**नक्षत्र : अनुराधा**



**-: जन्मराशी :-**
००-०१ ते २४-०० वृश्चिक

**रवी उदय- ०६-५७**
**रवी अस्त- १७-५९**

**बुधाचा सायं. पश्चिमेस लोप, अमावास्या सकाळी ११.५१ पर्यंत, एड्स निर्मूलन दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# पाककृती



## गोवन कोळंबी सार



★**साहित्य** :- कोळंबी ५०० ग्रॅम, १/२ चमचा मीठ, १/२ चमचा हळद पावडर, १ चमचा लिंबाचा रस, १ चमचे धणे, १ टीस्पून जिरे, १ कप किसलेले ताजे खोबरे (वाटून दूध काढणे), ८-१० काश्मिरी कोरड्या लाल मिरच्या, ५-६ लवंगा, १ चमचे काळे मिरी, १ इंच दालचिनीच्या काडीचा तुकडा, २ कप बारीक चिरलेला कांदा, २ कप बारीक चिरलेला टोमॅटो, २ हिरव्या मिरच्या बारीक चिरून, २ चमचे चिंचेची पेस्ट, चवीप्रमाणे मीठ.

★ **कृती** :- मध्यम आकाराची कोळंबी स्वच्छ करून एका भांड्यात घेऊन त्यात हळद पावडर, लिंबाचा रस, मीठ लावून मुरत ठेवा. आता धणे, जिरे, किसलेले खोबरे, काश्मिरी कोरड्या लाल मिरच्या, लवंगा, काळे मिरी, दालचिनीच्या काडीचा तुकडा अर्धा कप पाणी घालून मिक्स करून बारीक वाटून घ्या. कढईत १ टेबलस्पून तेल मध्यम आचेवर गरम करा. तेल गरम झाल्यावर मुरत ठेवलेली कोळंबी घाला आणि २-३ मिनिटे शिजवा. नंतर कोळंबी एका प्लेटमध्ये काढून घ्या. आता त्याच कढईत उरलेले २ चमचे तेल घाला मध्यम आचेवर गरम करा. पॅनमध्ये २ कप चिरलेला कांदा आणि चिरलेल्या हिरव्या मिरच्या घाला. कांदे गुलाबी होईपर्यंत परतत राहा. कांदा परतल्यावर त्यात बारीक चिरलेला टोमॅटो घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परतून घ्या. आता त्यात गरम मसाल्याचे वाटण टाका, १ कप पाणी, मीठ, चिंचेची पेस्ट टाकून चांगले मिक्स करून घ्या. मंद गॅसवर ८-१० मिनिटे झाकण ठेवून शिजवा. मध्येच नारळाचे दूध आणि शिजवलेले कोळंबी घाला. पुन्हा २-३ मिनिटे उकळवा. गोवन प्रॉन सार खाण्यासाठी तयार झाले. सार घट्ट असल्यास अधिक पाणी घाला. गरमागरम सर्व्ह करा.



# न्यूझीलंडच्या फलंदाजांची खराब कामगिरी इंग्लंडच्या संघाची कसोटीवर पकड मजबूत




**इंग्लंडविरुद्धच्या कसोटीच्या दुसऱ्या डावात आज दिवसाअखेर न्यूझीलंडच्या संघाने ६ बाद १५५ धावा केल्यामुळे इंग्लंडने कसोटीवर आपली पकड मजबूत केली आहे. इंग्लंडविरोधात पहिल्या डावात ९३ धावांची शानदार खेळी करणाऱ्या न्यूझीलंडच्या केन विल्यमसनने दुसऱ्या डावात आपली २६ वी धाव पूर्ण करताच कसोटीत ९००० धावा पूर्ण केल्या. ही कामगिरी करणारा तो न्यूझीलंडचा पहिला फलंदाज ठरला.**

■ ख्रिस्टचर्च

२८ **नोव्हेंबरपासून** सुरू झालेल्या या कसोटीत न्यूझीलंडने पहिल्या दिवशी फलंदाजी करत दिवसाचा खेळ संपेपर्यंत ८ विकेट गमावून ३१९ धावा केल्या होत्या. दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडचा पहिला डाव ३४८ धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात इंग्लंडची फलंदाजी उत्कृष्ट झाली. ऑली पोपच्या ७७ आणि बेन स्टोक्सच्या ८० धावांच्या जोरावर इंग्लंड संघाने पलटवार करत ४९९ धावा केल्या. आज तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावाची सुरुवात खूपच खराब झाली. अवघ्या २३ धावांत न्यूझीलंडच्या दोन्ही सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. यानंतर केन विल्यमसन आणि रचिन रवींद्र यांनी आघाडी घेत चहापानाच्या वेळेपर्यंत संघाची धावसंख्या २ बाद ६२ पर्यंत नेली. मात्र त्यानंतर विल्यमसनचे ६१ आणि रचिन रवींद्र २४ धावा करून बाद झाले. त्यानंतर आलेल्या फलंदाजांना मोठी खेळी करता न आल्याने दिवसाअखेर न्यूझीलंडच्या संघाने ६ बाद १५५ धावा केल्या. इंग्लंडवर चार धावांची आघाडी घेतली असली तरी न्यूझीलंडचा पराभव पक्का मानला जात आहे.

## दुखापतीमुळे जोश हेझलवूड ॲडलेडच्या कसोटीतून बाहेर

■ सिडनी

बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिका सुरू असताना मिचेल मार्शच्या दुखापतीमुळे चिंतेत असलेल्या ऑस्ट्रेलियाला वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडच्या रूपात अजून एक धक्का बसला. दुखापतीमुळे हेझलवूड ६ डिसेंबरपासून ॲडलेड ओव्हल येथे होणाऱ्या दुसऱ्या रात्र-दिवस कसोटीतून बाहेर झाला.

ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने सीन ॲबॉट आणि ब्रेंडन डॉगेट यांचा संघात समावेश करण्यात आला. हेझलवूड हा ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा मुख्य गोलंदाज आहे. त्याने पर्थ कसोटीत पहिल्या डावात सर्वाधिक ५ विकेट्स घेत भारतीय संघाच्या फलंदाजांना जेरीस आणले होते. ज्यामुळे भारताला ऑस्ट्रेलियन संघाने १५० धावांवर सर्वबाद केले.

## भारतीय संघासाठी नवीन जर्सी लॉन्च

■ मुंबई

**भारतीय** पुरुष आणि महिला संघासाठी बीसीसीआयने एकदिवसीय सामन्यांची नवीन जर्सी लॉन्च केली. यावेळी बीसीसीआयचे सचिव जय शहा आणि भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरही उपस्थित होती.




ही जर्सी प्रसिद्ध जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी अदिदासने बनवली. टीम इंडियाची पूर्वीची जर्सी पूर्णपणे निळ्या रंगाची होती आणि तिच्या खांद्यावर तीन अदिदासचे पट्टे होते. यावेळी खांद्यावर असलेल्या तीन आदिदास पट्ट्यांना तिरंग्याची छटा देण्यात आली आहे. या जर्सीचा निळा रंग आधीच्या जर्सीपेक्षा किंचित हलका आहे. त्याच्या बाजूने गडद रंग देण्यात आला. बीसीसीआयने नवीन जर्सीचा व्हिडिओ एक्स आणि इन्स्टाग्रामवर शेअर केला. नवीन जर्सीबद्दल हरमनप्रीत कौर म्हणाली, 'माझ्या उपस्थितीत नवीन जर्सी लाँच करण्यात आली. ही माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. महिला संघ वेस्ट इंडिजविरुद्ध प्रथमच नवीन जर्सी घालणार आहे. वेस्ट इंडिजचा संघ डिसेंबरमध्ये भारत दौऱ्यावर येणार आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात ३ वनडे आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे.

## राष्ट्रीय अजिंक्यपद (ज्युनिअर) खो-खो स्पर्धा सलग दहाव्यांदा महाराष्ट्राला दुहेरी मुकुट

**ओडिशाच्या संघांचा पराभव**

■ अलिगड




४३ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद ज्युनिअर (मुले-मुली) खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी सलग दहाव्यांदा विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुटाचा मान मिळविला. मुलांच्या गटाचे हे १९ वे तर मुलींचे १० वे सलग विजेतेपद आहे. या विजयासह महाराष्ट्राच्या मुलांचे हे एकूण ३५ वे तर मुलींचे २६ वे राष्ट्रीय अजिंक्यपद आहे.

अंतिम सामन्यात महाराष्ट्राने दोन्ही गटांत ओडिसा संघाला नमवित ही कामगिरी केली. मुलींच्या गटात अश्विनी शिंदेच्या (३.३०, २.३० मि. संरक्षण व २ गुण) अष्टपैलू खेळीमुळे महाराष्ट्राने ओडिसाचा धुव्वा उडवला. अश्विनीला तन्वी भोसले (२.१० मि. संरक्षण), स्नेहा लामकाने (१.३० मि. संरक्षण), प्रणाली काळे (१.१० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी साथ दिली. परंतु महाराष्ट्राच्या संरक्षक सुहानी ढोरे (१.२० मि. संरक्षण व ६ गुण) व प्राजक्ता बिराजदार यांनी (२ मि. संरक्षण) दुसऱ्या डावात बहारदार खेळी करीत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. सानिका चाफे हिने आपल्या धारदार आक्रमणात पहिल्या डावात व दुसऱ्या डावात प्रत्येकी चार खेळाडू टिपले. ओडिसाच्या अर्चना प्रधान (२.०० मि. ४ गुण ), लीसा राणी (१.०० मि. ६ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

## द.आफ्रिकेत मॅच फिक्सिंग ३ माजी क्रिकेटपटूंना अटक

■ केपटाऊन

**दक्षिण** आफ्रिकेत क्रिकेट मॅच फिक्सिंगचे प्रकरण उघड झाले आहे. २०१५-२०१६ देशांतर्गत टी-२० राम स्लॅम चॅलेंजदरम्यान मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी असल्याबद्दल गुन्हेगारी तपास (हॉक्स) एजन्सीने तीन माजी क्रिकेटपटूंना अटक केली. ज्यामध्ये अथी म्बालाथी (४३), थामी सोलेकिल (४४) आणि लोनवाबो त्सोत्सोबे (४०) हे तीन खेळाडू आहेत. तपासादरम्यान दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू गुलाम बोदीने अनेक खेळाडूंशी संपर्क साधून त्यांना तीन टी-२० सामन्यांच्या निकालांवर प्रभाव टाकण्यास सांगितले. हॉक्सचे प्रवक्ते कर्नल कटलेगो मोगले यांनी सांगितले की, म्बालाथी आधीच प्रिटोरिया विशेष व्यावसायिक गुन्हे न्यायालयात हजर झाला. या प्रकरणाची सुनावणी २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

## जे.जे.चे बुजुर्ग क्रिकेटपटू चंद्रकांत नाईक सेवानिवृत्त

■ मुंबई

**जे. जे.** रुग्णालय क्रिकेट संघाचे सलामीवीर चंद्रकांत नाईक यांना सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचे जे.जे. हॉस्पिटलमधील सहकारी डॉक्टर, स्टाफ तसेच क्रिकेट क्षेत्रातील मान्यवरांनी भावपूर्ण निरोप दिला. जे. जे. हॉस्पिटल प्रशासकीय भवन सभागृहामधील सोहळ्यात प्रमुख पाहुण्या डॉ. शुभांगी दळवी यांनी प्रयोगशाळा तंत्रज्ञ चंद्रकांत नाईक यांच्या ३५ वर्षे जे.जे. हॉस्पिटल सेवा काळाबद्दल प्रशंसोद्गार काढले. शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त लीलाधर चव्हाण यांनी यष्टीरक्षक व सलामीवीर चंद्रकांत नाईक यांच्या जे.जे. रुग्णालयीन संघामधील कामगिरीसह क्रिकेट विश्वातील योगदानाची मुक्त कंठाने स्तुती करीत आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीमार्फत शाल, श्रीफळ व सन्मानचिन्हाद्वारे त्यांच्या कारकिर्दीचा सपत्निक गौरव केला.

## सरस्वती मंदिर-कुलकर्णी हायस्कूल खो-खोच्या अंतिम फेरीत भिडणार

■ मुंबई

**माहीमच्या** सरस्वती मंदिर हायस्कूलतर्फे आयोजित अमृत महोत्सवी आंतरशालेय खो-खो स्पर्धेच्या अंतिम फेरीत सरस्वती मंदिर हायस्कूल आणि डी. बी. कुलकर्णी हायस्कूल भिडणार आहेत. पहिल्या उपांत्य फेरीत सरस्वती मंदिर हायस्कूलने शारदाश्रम विद्या मंदिरला ८-६ असा अटीतटीच्या लढतीत पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

सरस्वती संघाकडून ओम ननावरे (संरक्षणात १:३० मि. व ३:४० मि., आक्रमणात १ गुण), शिवम झा (संरक्षणात १:१० मि. नाबाद, आक्रमणात २ गुण) आणि नॉयल हेलन (संरक्षणात ३:३० मि.) यांच्या उत्कृष्ट खेळीने विजय निश्चित केला. शारदाश्रमकडून विराज खेडेकर (संरक्षणात १:३० मि., आक्रमणात ३ गुण) आणि निहाल पंडित (संरक्षणात ३:३० मि. व २ मि., आक्रमणात १ गुण) यांनी चमकदार खेळ केला, पण संघाला पराभवापासून वाचवू शकले नाहीत. दुसऱ्या उपांत्य फेरीत डी. बी. कुलकर्णी हायस्कूलने अहिल्या विद्या मंदिरवर १३-५ असा एकतर्फी विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. डी. बी. कुलकर्णी संघाकडून आदर्श रुके (संरक्षणात ४:३० मि., आक्रमणात १ गुण), अफसार शेख (संरक्षणात २:२० मि., आक्रमणात १ गुण) आणि कार्तिक तोरस्कर (संरक्षणात २ मि. नाबाद, आक्रमणात ३ गुण) यांनी अप्रतिम खेळ दाखवला. अहिल्या विद्या मंदिरकडून अर्णव गावडे (संरक्षणात १ मि., आक्रमणात १ गुण) आणि साईराज कुबल (आक्रमणात १ गुण) यांनी संघाला झुंजवण्याचा प्रयत्न केला. परंतु विजय मिळवण्यात अपयश आले.



**मार्गशीर्ष महिन्याला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. हा हिंदू कॅलेंडरचा नववा महिना आहे. मार्गशीर्षपेक्षा मोठा कोणताही महिना नाही - मासोनम मार्गशीर्षोहम. या महिनाभर भगवान श्रीकृष्ण आणि देवी लक्ष्मीची पूजा केली जाते. या काळात पितरांना नैवेद्य अर्पण केल्याने त्यांच्या आत्म्याला शांती मिळते, असेही मानले जाते. याने त्यांना मोक्ष प्राप्त होतो. मार्गशीर्ष महिना हा व्रत वैकल्यासाठी खास असतो. कारण या महिन्यातील महालक्ष्मीचे व्रत सुख समृद्धीकारक ठरतात. मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवार, मार्गशीर्ष पौर्णिमा, दत्त जयंती या व्रत आणि सण-उत्सवाने हा महिना सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणणारा आहे. हा महिना भगवान श्रीकृष्णाच्या उपासनेसाठी समर्पित आहे म्हणून हिंदू धर्मात या महिन्याला खूप महत्त्व आहे. या काळात जास्तीत जास्त धार्मिक कार्य करावे.**



# सुख शांती समाधान

## मार्गशीर्ष महिन्यात हे करा...

मार्गशीर्ष हा भारतीय पंचांगानुसार वर्षातील नववा महिना असून याला अग्रहायण किंवा अगहन असेही म्हणले जाते.

मार्गशीर्ष महिन्यात दान करावे. आपल्या क्षमतेनुसार ब्राह्मणाला अन्नदान करतो, तो रोग आणि पापांपासून मुक्त होतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे. मार्गशीर्ष महिन्यात व्रत केल्यास मनुष्य पुढील जन्मी रोगमुक्त व बलवान होतो.

या महिन्यात पितृ तर्पण करावे. ज्यांना गंगा घाटाजवळ पितृ तर्पण करता येत नाही, ते घरी स्नान करून, देशी तुपाचा दिवा लावून आणि घरी पुजाऱ्याला बोलावून पितृ तर्पण करू शकतात.

या वेळी ब्राह्मणाला अन्नदान करा आणि त्याला वस्त्र आणि दक्षिणा द्या.

या महिन्यात ब्लँकेट आणि उबदार वस्तूंचे दान करावे.

या महिनाभर भगवान सूर्याला अर्घ्य अर्पण करा आणि सकारात्मकतेने तुमच्या दिवसाची सुरुवात करा.

तसेच या महिन्यात रोज गीता पाठ करा. श्रीकृष्णाची यथाशक्ती पूजा करा. कान्हाला तुळशीची पाने अर्पण करून प्रसाद म्हणून स्वीकारा.

मार्गशीर्ष महिन्यात विष्णुसहस्त्र नाम, भागवत गीता आणि गजेंद्रमोक्षाचे पठण करावे.

या महिन्यात भगवान श्रीकृष्ण, श्री हरी आणि माँ लक्ष्मीची पूजा करावी. या महिन्यात सर्व गुरुवारी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची पूजा करावी. असे मानले जाते की मार्गशीर्ष महिन्यात माता लक्ष्मी पृथ्वीवर येते आणि ज्या घरात तिची विधिवत पूजा केली जाते तेथे वास करते.



**मार्गशीर्ष गुरुवारी का करतात?**

मार्गशीर्ष गुरुवारचे व्रत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पाळले जाणारे व्रत आहे. असे म्हणतात की मार्गशीर्ष गुरुवारी व्रत करून लक्ष्मी आणि भगवान विष्णूची पूजा केल्याने भक्तांना लक्ष्मी-नारायणाची कृपा प्राप्त होते आणि देवी लक्ष्मीच्या कृपेने सुख, समृद्धी आणि ऐश्वर्य प्राप्ती होत.

**श्रीमहालक्ष्मी-व्रत**

व्रताच्या दिवशी दिवसभर उपवास करावा व संध्याकाळी पूजा-आरती-कहाणी झाल्यावर श्री महालक्ष्मी देवीला नैवेद्य दाखवावे. व्रताचे उद्यापन करावयाच्या दिवशी संध्याकाळी सात सुवासिनी किंवा सात कुमारिकांना घरी बोलवून त्यांच्यांत महालक्ष्मीस्वरूप मानून त्यांना हळदी-कुंकु लावावे. मनोभावे नमस्कार करावा. नंतर पूजा, आरती, कहाणी करून प्रसाद म्हणून फळ, सौभाग्य म्हणून गजरा, व महालक्ष्मी व्रतकथा पोथीची एक प्रत प्रत्येकीला द्यावी. यथाशक्ती भेटवस्तू देखील देऊ शकता. त्यांची ओटी भरुन मनोभावे नमस्कार करावा.

प्रसाद म्हणून दूध किंवा इतर फराळ द्यावा.

या संपूर्ण महिन्यात सात्विक अन्न खावे.

या महिन्यात नर्मदा, शिप्रा, यमुना अशा कोणत्याही पवित्र नदीत स्नान करणे पुण्यकारक मानले जाते.

या काळात गाई, कावळे, कुत्रे आणि मुंग्यांना अन्न देणे अत्यंत फलदायी असते. या महिनाभर दानधर्म करणे अत्यंत शुभ मानले जाते.

पहाटे लवकर उठून आंघोळ करावी, स्वच्छ वस्त्र परिधान करावे. अंगणात आणि पूजेच्या ठिकाणी रांगोळी काढावी. त्यामध्ये माता लक्ष्मीचे पावलं अवश्य काढावी. यानंतर माता लक्ष्मीचे आसन सजवावे.

सर्वप्रथम सकाळी उठून सर्व कामे उरकून, आंघोळ करून स्वच्छ कपडे घाला.

श्रीगणेशाचे आणि माता लक्ष्मीचे ध्यान करा आणि व्रत-उपासनेचा संकल्प करा. चौरंगावर स्वच्छ लाल किंवा पिवळे वस्त्र ठेवून त्यावर लक्ष्मीची मूर्ती स्थापित करा.

यानंतर कलशात पाणी भरून त्यात सुपारी, दुर्वा, अक्षता आणि नाणे टाकावे.

आता कलशावर पाच विड्याची, आंब्याची किंवा पंचपत्री कलशावर ठेवून त्यावर नारळ ठेवा.

तांदूळ चौरंगावर पसरवा आणि त्यावर कलश स्थापित करा.

आता हळद-कुंकू आणि फुलांचा हार अर्पण करून कलशाची पूजा करा.

कलशापुढे विडा, खोबरे, खारीक, बदाम, इतर फळे, खडीसाखर किंवा गूळ ठेवा.

त्यानंतर देवीच्या मूर्तीला हळद आणि कुंकू लावून सजवा.

फुले, हार, अगरबत्ती आणि गोड पदार्थाचा नैवेद्य अर्पण करून लक्ष्मीची पूजा करा.

देवी लक्ष्मीला प्रसाद म्हणून मिठाई, खीर आणि फळे अर्पण करा.

व्रताच्या दिवशी महालक्ष्मी व्रताची कथा वाचा किंवा ऐका. देवी लक्ष्मीच्या मंत्रांचा जप करा.

व्रताची कथा संपल्यानंतर देवी लक्ष्मीची आरती करून सर्वांना प्रसाद वाटा.

संध्याकाळी पुन्हा माता लक्ष्मीची पूजा करा आणि दिवा लावा. घराबाहेर आणि अंगणातही दिवा ठेवा.

मार्गशीर्ष महिन्यातील सर्व गुरुवार असे व्रत करावे आणि शेवटच्या दिवशी उद्यापन करावे. उद्यापनाच्या दिवशी ओळखीच्या किंवा आजुबाजूच्या महिलांना बोलवून त्यांना हळदी-कुंकू लावावे, गजरा द्यावा, महालक्ष्मीचे व्रताची पोथी, एखादे फळ, दक्षिणा द्यावी. तसेच प्रसाद म्हणून गोड दूध, मिठाई किंवा जेवण द्यावे. त्यांना नमस्कार करावा. रात्री कुटुंबासह मिष्टान्न व भोजन करावे.

पूजा करताना आणि कहाणी वाचताना मन शांत आणि आनंदी असावे. घरातील वातावण आनंदी असावे. एखादी अडचण आल्यास हे व्रत इतर कोणाकडूनही पूर्ण करून घ्यावे, परंतु उपवास आपणच करावा.

### मार्गशीर्ष महिन्यात मंत्रांचा जप करा-

ॐ कृष्णाय नम:।।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे।
हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।।
ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने। प्रणत क्लेशनाशाय गोविन्दाय नमो नम:।।
ॐ श्रीह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्मी नम:

## कार्तिक अमावास्येला हे उपाय करा...



ज्योतिषशास्त्रानुसार हिंदू धर्मातील प्रत्येक दिवसांचे महत्त्व वेगळे आहे. त्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात येणारी अमावास्याही देखील खास मानली जाते. अशातच कार्तिक महिन्यातील अमावास्येला वेगळे महत्त्व आहे.

ही अमावस्या तिथी १ डिसेंबरला आहे. धार्मिक मान्यतेनुसार अमावस्येच्या दिवशी पूर्वज मृत्यूलोकातून पृथ्वी तलावावर येतात. त्यामुळे पितरांसाठी तर्पण, पिंडदान आणि श्राद्ध इत्यादी केले जाते. त्यामुळे पितृदोष नाहीसा होऊन पितरांचा आशीर्वाद मिळतो.

कार्तिक अमावास्येला पितरांचा आशीर्वाद मिळवण्यासाठी अन्नदान करायला हवे. या दिवशी स्नान करुन तर्पण केल्यानंतर कच्चे तांदूळ, डाळ, गहू इत्यादी दान करता येते. तर घरात सात्विक अन्न तयार करुन त्यातील काही भाग काढून घ्यावा. तो भाग गाय, कावळा, कुत्रा यांना खाऊ घालावा. याला पंचबली कर्म असे म्हणतात.

कार्तिक अमावास्येला पितरांच्या नावाने दिवे दान करा. परंतु, हा दिवा सूर्यास्तापूर्वी दान करायला हवा. त्यानंतर मातीच्या दिव्यात राईचे तेल घालून दिवा लावा. या दिव्याचे तोंड दक्षिण दिशेला ठेवा. असे केल्याने पितरांचा आशीर्वाद आपल्यावर राहतो. तसेच कुटुंबात सुख-समृद्धी आणि प्रगती टिकून राहाते.

---

## मंदिराच्या १०० मीटर परिसरात खलिस्तानींना न्यायालयाकडून बंदी

■ ओटावा

**कॅनडातील** मंदिर परिसरात हिंदुवर झालेल्या हल्ल्यानंतर मंदिराच्या आवारातील समुपदेशनासाठी आयोजित केलेल्या कॅम्पच्या १०० मीटर परिसरात खलिस्तान्यांना न्यायालयाकडून प्रवेश बंदी करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत.

कॅनडातील मंदिर परिसरात हिंदूवर झालेल्या हल्ल्यानंतर लक्ष्मी नारायण मंदिर समितीकडून न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेत हिंदुंच्या



मंदिर परिसरात समुपदेशनाचे वर्ग चालवले जातात. यावेळी अशा कार्यक्रमांमध्ये खलिस्तानी समर्थक घुसतात आणि कार्यक्रम उधळून लावण्याचा प्रयत्न करतात. यावर तत्काळ कारवाई करण्यास पोलिसांना सांगावे तसेच मंदिर परिसरात खलिस्तानी समर्थकांना येण्यास मज्जाव करावा, अशी याचिकेत मागणी करण्यात आली होती.



उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी लखनौ येथे सदिच्छा भेट घेतली.

## अवैध मार्गाने निवडणूक जिंकली! भाजपा आमदाराविरोधात याचिका

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीर** विधानसभा निवडणुकीत छेनानी मतदारसंघात भाजपाच्या विजयी उमेदवाराने अवैध मार्गांचा अवलंब करून निवडणूक जिंकली, असा आरोप करत या विजयाला आव्हान देणारी याचिका पराभूत उमेदवाराने दाखल केली आहे. जम्मू काश्मीर व लडाख उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रजनेश ओसवाल यांनी ही याचिका दाखल करून घेत संबंधितांना आपले म्हणणे मांडायला सांगितले आहे.

छेनानी मतदारसंघातील पराभूत उमेदवार व नॅशनल पँथर पार्टीचे नेते हर्श देव सिंग यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेत म्हटले आहे की, भाजपाचे विजयी उमेदवार बलवंत सिंग मनकोटिया यांनी या निवडणुकीत अनेक अवैध मार्गांचा अवलंब केला. त्यांनी मतदारांवर दबाव टाकला. प्रचारात धार्मिक मुद्द्यांचा वापर केला.

### जाहिर नोटिस

या जाहिर नोटीशीद्वारे माझे अशिल १) श्री फेनिल गिरिष भेदा, २) श्री दिपक धारशी भेदा, ३) श्री गिरिष धारशी भेदा, ४) श्री लिना धर्मेन्द्र पटेल ५) श्री दिनेश शांतीलाल चापलोट, ६) श्री अमित मनोज शाह, ७) श्री धर्मेश मनोज शाह, ८) सौ. प्रविणा अनिल गाला, ९) श्री मुदित दिनेश चापलोट, वतीने तमाम लोकांस कळवितात की, माझे अशिल मेसर्स फॅनकिंन इन्फोटेक, एलएलपी भागिदारी संस्था, ज्याचा नोंदणीकृत पत्ता ४०४, सेंट्रम आयटी पार्क को. ऑप. प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., एस. जी. बर्वे मार्ग, वागळे इस्टेट, ठाणे ४०० ६०४, असा असून, या संस्थेत भागिदार म्हणून होते. माझे अशिल या द्वारे जाहिर करतात की, मेसर्स फॅनकिंन इन्फोटेक, एलएलपी भागिदारी संस्थेतून माझे अशिल १) श्री फेनिल गिरिष भेदा, २) श्री दिपक धारशी भेदा, ३) श्री गिरिष धारशी भेदा, ४) श्री लिना धर्मेन्द्र पटेल, ५) श्री दिनेश शांतीलाल चापलोट, ६ ) श्री अमित मनोज शाह, ७) श्री धर्मेश मनोज शाह, ८) सौ. प्रविणा अनिल गाला, आणि ९) श्री मुदित दिनेश चापलोट, दिनांक ०९/१०/२०२४ रोजी निवृत झालेले आहेत. या पुढे मेसर्स फॅनकिन इन्फोटेक, एलएलपी या संस्थेच्या दिनांक ०९/१०/२०२४ पासून सदर संस्थेच्या व्यवहाराशी माझा अशिलाचा कुठल्याही प्रकारचा हक्क किंवा हितसंबंध राहिलेला नाही. दिनांक ०९/१०/२०२४ पासून भागिदारी संस्थेचे भागिदार राहिलेले नसून भागिदारी संस्थेच्या कुठल्याही कृतीस किंवा व्यवहारास माझे अशिलाची जबाबदारी राहणार नाही. सदर बाबतीत या पुढे सर्व संबंधित लोकांनी, बँकेनी यांची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(अजीज एन. अरवाई)**
वकील,
२ रा मजला, मदिना मंझील, जे. बी. कारिया स्टॉरचे वर,
महात्मा ज्योतिबा फुले मार्केट समोर, ठाणे (प) ४००६०१.

ठाणे,
दिनांक : ३०/११/२०२४

## तिलारी घाटात कर्नाटकची मिनीबस ट्रकला धडकली

■ दोडामार्ग

**कर्नाटकहून** गोव्याकडे चाललेली खासगी मिनी बस एका ट्रकला धडकल्याची घटना तिलारी घाटात घडली. या बसमधील काही प्रवासी किरकोळ जखमी झाले. जखमींना उपचारासाठी बेळगाव येथील रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.





कर्नाटकातील बेळगाव शहरातून निघालेली एक मिनी खासगी बस तिलारी घाटमार्गे गोव्याकडे जात होती. ही बस तिलारी घाट उतरत असताना जयकर पॉईंटजवळ चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले अणि बस एका ट्रकवर धडकली.

या अपघातात बसमधील काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. त्यांना बेळगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. समोर ट्रक नसता तर ही बस खोल दरीत पडून मोठा अनर्थ घडला असता असे काही प्रवाशांनी सांगितले.

## निकालाआधीच उमेदवाराने मतदानाचा आकडा सांगितला

### रोहिणी खडसे यांचा आरोप

■ जळगाव

**विधानसभा** निवडणुकीच्या निकालानंतर ईव्हीएम मशीनमध्ये गडबड असल्याचा आरोप होत असतानाच शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा आणि मुक्ताईनगरच्या पराभूत उमेदवार रोहिणी खडसे यांनी गंभीर आरोप केला.

निकालाआधीच प्रतिस्पर्धी उमेदवाराने सोशल मीडियावर मतदानाचा आकडा सांगितला होता, हा आकडा निकालाशी मिळताजुळता असल्याचे त्यांनी सांगितले. मुक्ताईनगरमधील १६ मतदान केंद्रावरील व्हीव्हीपॅटच्या पावत्यांची मोजणी करावी, अशा मागणीसाठी त्यांनी निवडणूक आयोगात अर्ज दाखल केला. रोहिणी खडसे यांनी सांगितले की, मुक्ताईनगरात अनेक मतदान केंद्रावर संशयास्पद निकाल लागला आहे.

मुक्ताईनगरात निकाल लागण्याआधीच एक यादी सोशल मीडियावर व्हायरल केली होती. या यादीत प्रतिस्पर्धी उमेदवाराने अमुकतमुक मते मिळतील, अशी खात्रीलायक माहिती दिली होती. या यादीतील आकडे आणि निकाल लागल्यानंतर विशिष्ट मतदान केंद्रावरील मताचे आकडे तंतोतंत कसे जुळले? असा प्रश्न निर्माण होत आहे. पाच-दहा मते इकडे-तिकडे केल्यास त्या यादीतील अंदाजाप्रमाणे अचूक निकाल लागला असल्यामुळे संशय निर्माण झाला आहे. असा कोणताही ज्योतिषी जन्माला आलेला नाही, जो दोन दिवसांनी लागणाऱ्या निकालाचे आकडे इतक्या अचूक पद्धतीने आधीच सांगू शकेल. हे सर्व संशयास्पद आहे.

### (अनुसूची)
### फॉर्म ए - जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**भाग्योदया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

संबंधित तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | भाग्योदया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | ६ जुलै, १९७४ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. | L65990MH1974PLC017178 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | "३रा मजला, ऑर्बिट टेरेसेस, ६४, ना. म. जोशी मार्ग, (एस. बी. मार्गचे जंक्शन), लोअर परेल (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०००१३." |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | आदेश घोषित: २७ नोव्हेंबर, २०२४ (आयआरपीला आदेश दि. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी सूचित करण्यात आला) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | २८ मे, २०२५ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री विमल कुमार अग्रवाल IBBI/IPA-001/IPP00741/2017-2018/12247 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. ४, तळमजला, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनजवळ, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ईमेल: vimal@vpagrawal.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. ४, तळमजला, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनजवळ, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ईमेल: cirpbhagyaodaya@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३ डिसेंबर, २०२४ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६ए)च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गातील तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल: | अ) https://ibbi.gov.in/downloadform.html ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी **भाग्योदया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट लिमिटेडची** कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश **दि. २७ नोव्हेंबर, २०२४** रोजी दिले आहेत. **भाग्योदया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट लिमिटेडच्या** धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. १३ डिसेंबर, २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी:** विमल कुमार अग्रवाल
**दिनांक आणि ठिकाण:** दि. ०१ डिसेंबर, २०२४, मुंबई

### नमुना ए
### जाहीर घोषणा

(इन्सॉल्व्हन्सी अॅण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ६ अन्वये)

**आरपीएल सोलार पावर प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

संबंधित तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **आरपीएल सोलार पावर प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | २६.०८.२०१५ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणको स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी कायदा २०१३ अन्वये कंपनी निबंधक - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U40109MH2015PTC267777 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचे (काही असल्यास) पत्ता | नोंद.कार्यालय :-रहेजा पॉईंट विंग बी, ७वा मजला, नेहरू रोड, शामराव विठ्ठल बँक जवळ, वाकोला, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०००५५. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | २६.११.२०२४ (आदेश प्राप्त दि.२९.११.२०२४) |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | २५.०५.२०२५ (आदेश दि.२६.११.२०२४ पासून १८० दिवस) |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात) त्यांचे संचालकामार्फत श्री.मोहित बीपीनचंद्र अदातिया IBBI Reg. No.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः एच-३५, १ला मजला, जंगपुरा एक्सटेंशन, जंगपुरा, दक्षिण-दिल्ली, नवी दिल्ली - ११००१४. ई-मेलः ipe@npvca.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | पत्रव्यवहाराचा पत्ताः १०वा मजला,१००३, झीओन झेड१, एव्हॅलॉन हॉटेल जवळ, सिंधू भवन रोड, थालतेज, अहमदाबाद - ३८००५४. प्रक्रिया ई-मेल आयडीः rplsolarpower.ibc@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १३.१२.२०२४ (आदेश प्राप्त झाल्याची तारीख दि.२९.११.२०२४ पासून १४ दिवस) |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | अ) www.ibbi.gov.in rplsolarpower.ibc@gmail.com ब) लागू नाही |

येथे सूचना देण्यात येत आहेकी, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ - ५ ने दि.२६.११.२०२४ रोजी **आरपीएल सोलार पावर प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी रिझोल्यूशन प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत (दि.२९.११.२०२४ रोजी आदेश प्राप्त झाला)

**आरपीएल सोलार पावर प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना दि.१३.१२.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे **बाब क्र. १०** विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करण्याचे आवाहन केले आहे.

आर्थिक कर्जदारांनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व कर्जदार पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.

बाब क्र.१२ मध्ये सूचीबद्ध केल्यानुसार वर्गाशी संबंधीत वित्तीय धनको, फॉर्म सीए मध्ये वर्गाचा (एनए) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी बाब क्र.१३ विरुद्ध सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोर व्यावसायिकांपैकी अधिकृत प्रतिनिधीची निवड सूचित करेल. दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

**आयपीई- एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड**
(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात)
**त्यांचे संचालकामार्फत - श्री. मोहित विपीनचंद्र अदातिया**
अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून नियुक्ती
आरपीएल सोलर पॉवर प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत
आयबीबीआय नोंद.क्र.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021
**पत्रव्यवहारासाठी ईमेल** - rplsolarpower.ibc@gmail.com

**दिनांक:** ०१.१२.२०२४
**ठिकाण:** जुनागड

### जाहीर सूचना

१) श्री. हिरेन बिपिनभाई पडिया, २) श्री. धर्मेशभाई देवराजभाई पांभार व (३) श्री. महेश बाबूभाई पांभार यांच्या वतीने सूचना देण्यात आली आहे की, हे कळविण्यात येते की, १) श्री. हिरेन बिपिनभाई पडिया, २) श्री. धर्मेशभाई देवराजभाई पांभार व ३) श्री. महेश बाबूभाई पांभार हे सदर इंड युनिट क्र. १४, तळमजल्यावर, मोजमाप क्षेत्र ५३८ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्र असलेले, द नितीन इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. म्हणून ज्ञात सोसायटीमधील, सुहासिनी पावसकर रोड, घरटण पाडा क्र.१, दहिसर - पूर्व, मुंबई - ४०० ०६८ खरेदी करण्याचा विचार आहे, जे सीटीएस क्र.२९४५, २९४६ या भूखंडावर, महसूल गाव दहिसर, तालुका बोरिवली, जिल्हा मुंबई येथे स्थित आहे (यापुढे सदर मालमत्ता म्हणून संदर्भित), श्रीमती डॉ. कलावती धीरजलाल शहा यांचे दि.०२.०३.२०२३ रोजी आणि त्यांचे पती श्री. धीरजलाल शहा यांचे दि.२५.०३.१९९० रोजी निधन झाले, तदनंतर १) श्री. रोहित डी. शहा, विवाहित मुली १) श्रीमती निमिषा कमलेश शहा पूर्वीची सुश्री निमिषा धीरजलाल शाह आणि २) सौ.अमिता विपुल शाह पूर्वीची अमिता धिरजलाल शहा हे सदर मालमत्तेतील ५०% हक्कांचे एकमेव हयात असलेले कायदेशीर वारस होते, दि.२८.०४.२०२३ रोजीचे नोंद क्र.बीआरएल-२-६५८८/२०२३ च्या नोंदणीकृत रिलीज डीड श्री. रोहित डी. शाह यांच्या नावे निष्पादित च्या अनुषंगाने श्री. रोहित डी. शाह (एचयूएफ) आणि श्री. रोहित डी. शहा हे या मालमत्तेचे सध्याचे मालक आहेत.

सर्व व्यक्तीस, ज्यांना विषय मालमत्तेमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, देवाणघेवाण, भेटवस्तू, भाडेपट्टी, भाडेकरार, परवाना, गहाण, शुल्क, धारणाधिकार, विश्वास, वारसा, मृत्युपत्र, आराम, ताबा, लागवड, व्यवसाय, देखभाल, सामंजस्य करार, विकास हक्क, विक्रीचा करार किंवा अन्यथा याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही अधिकार, शीर्षक, हित, लाभ, दावा किंवा मागणी असल्यास त्यांनी खाली स्वाक्षरी केलेल्यांना, त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह पी.ओ.क्र. व्ही. पत्के ॲण्ड कं. ॲडव्होकेट्स, एफ-१, पहिला मजला, शाह आर्केड, राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७ येथे या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी कळविणे आवश्यक आहे, अन्यथा असे मानले जाईल की अशा सर्व व्यक्तींनी त्यांचे सर्व दावे, हक्क, हित आणि विषय मालमत्तेतील कोणत्याही स्वरूपाचे सर्व दावे, हक्क, हित आणि शीर्षक सोडले आहे आणि विषय मालमत्तेमध्ये कोणत्याही स्वरूपाचा कोणताही दावा, हक्क, शीर्षक किंवा हित नाही असे मानले जाईल.

दि.१ डिसेंबर २०२४ रोजी
**व्ही. पत्के अँड कं. ॲडव्होकेट्स**
एफ-१, पहिला मजला, शाह आर्केड, राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.

देश विदेश

# आयकर विभागाकडून मेहसाणातील कागद उत्पादक उद्योजकांवर छापे

■ मेहसाणा

**आयकर** विभागाने काल गुजरातमधील मेहसाणा येथील राधे ग्रुप या कंपनीच्या विविध ठिकाणांवर छापेमारी केली. करचुकवेगिरी व बनावट व्यवहारांप्रकरणी हे छापे मारण्यात आले आहेत. यावेळी संबंधित कागदपत्रेही जप्त करण्यात आली आहेत. राधे ग्रुपचे मालक महेंद्रा पटेल व त्यांच्या इतर सहकाऱ्यांशी संबंधित एकूण २४ ठिकाणी हे छापे मारण्यात आले आहेत. याबरोबरच सिरॅमिक उद्योगातील इतर दोन उद्योगांवरही हे छापे टाकण्यात आले. काल सकाळी आयकर विभागाने मोठा पोलीस फौजफाटा घेऊन




अहमदाबाद, मेहसाणा व मोरबी या ठिकाणी ही छापेमारी केली. राधे ग्रुप ही कागद निर्मिती व बांधकाम उद्योगातील कंपनी आहे. आर्थिक अनियमितता प्रकरणी या कंपनीची चौकशी केली जात आहे. तिर्थक ग्रुप या आणखी एका कागद निर्मिती व बांधकाम क्षेत्रातील कंपनीच्या विविध ठिकाणांवर व कंपनीचे मालक जिवराजभाई फुलत्रिया यांच्या निवासस्थानीही छापे मारण्यात आले.

# नाताळ निमित्ताने गोव्यात रात्री १२ पर्यंत लाऊडस्पीकर

■ पणजी

**गोवा** सरकारने आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, ख्रिसमस म्हणजेच नाताळ आणि नवीन वर्षाच्या निमित्ताने राज्यभरात रात्री १२ वाजेपर्यंत लाऊडस्पीकर लावण्यास सशर्त परवानगी दिली आहे. ही शिथिलता २४ डिसेंबर ते २६ डिसेंबर आणि ३१ डिसेंबरपर्यंत राहणार असून पर्यावरण खात्याचे संचालक जॉन्सन फर्नांडिस यांनी याबाबतची सूचना जारी केली आहे. राज्यातील सार्वजनिक ठिकाणी रात्री १० ते १२ वाजेपर्यंत वैयक्तिक अथवा अन्य कार्यक्रमांसाठी लाऊडस्पीकर लावण्यास परवानगी दिली.

# इस्कॉनविरोधात कारवाईसाठी बांगलादेशींचे तीव्र आंदोलन

**इस्कॉनवर बंदी घालण्याची मागणी**

■ ढाका

**इस्कॉनवर** बंदी घालण्यास बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने नकार दिल्यानंतर इस्कॉनविरोधात कारवाईसाठी काल बांगलादेशी मुस्लिमांनी तीव्र आंदोलन केले. कालच्या शुक्रवारच्या नमाजनंतर बांगलादेशी मुस्लीम नागरिकांनी ठिकठिकाणी आंदोलन केले. यावेळी लाखो मुस्लीम रस्त्यावर आले होते.

ढाका व चितगाव येथे नमाजनंतर मोठ्या संख्येने रस्त्यावर एकत्र आलेल्या मुस्लिमांनी इस्कॉनवर बंदी घालण्याची मागणी केली. इस्कॉन ही हिंदू दहशतवादी संघटना असल्याचे त्याचप्रमाणे ही संघटना राष्ट्रविरोधी असल्याच्या घोषणा त्यांनी दिल्या. यात हिफाजत ए इस्लाम, खिलाफत मजलिस आदी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता. राजधानी ढाका व चटगाव येथे मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. देशातील पराभूत शक्ती हिंदूचा वापर देशात अराजकता पसवण्यासाठी करत असल्याचा आरोपही यावेळी त्यांनी केला. इस्कॉनचा वापर करुन परकीय शक्ती सरकारच्या कामांमध्ये अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे बांगलादेशाचे धार्मिक मंत्री खालिद हुसैन यांनी म्हटले.

# नायजेरियात नाव उलटून १० प्रवाशांचा मृत्यू

■ अंबुजा

**नायजेरियातील** नायजर नदीत नाव उलटून १० प्रवाशांचा बुडून मृत्यू झाला. तर १०० प्रवासी बेपत्ता असून तटरक्षक दलाकडून त्यांचा शोध सुरू आहे. उत्तर नायजेरियातील कोगी राज्यातील पिस्सा समुदायाचे लोक आठवडी बाजारासाठी एका नावेतून जात होते. मात्र नावेत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी असल्याने नाव पलटी झाली आणि त्यातील सर्व प्रवासी नायजर नदीत पडले. त्यातील काहींनी पोहत कसाबसा किनारा गाठला. मात्र बहुसंख्य प्रवासी नदीच्या पाण्यात बुडाल्याचे सांगितले जाते. या दुर्घटनेची माहिती पोलिसांना समजताच बचाव कार्य सुरू केले.

# पंजाबमधील आंदोलक शेतकरी मुख्यमंत्र्यांना घेराव घालणार

**चंदीगढ - शेतकऱ्यांच्या** विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण करत असलेले नेते जगजित सिंग दालेवाल यांना ताब्यात घेऊन रुग्णालयात भरती केल्याच्या विरोधात मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानाला घेराव घालण्याचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या संग्रुर येथील निवासस्थानी उद्या घेराव घालण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. शेतकरी नेते दालेवाल हे पंजाब सीमेवरील संग्रुर व हरियाणाच्या सीमेवरील जिंद या गावांजवळ असलेल्या आपल्या खन्नौरी गावी आमरण उपोषणाला बसले होते. ६७ वर्षीय दालेवाल यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांना लुधियाना येथील दयानंद वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल केले.

# वाराणसीच्या केंट रेल्वेस्थानकावरील आगीमध्ये २०० दुचाकी भस्मसात

■ वाराणसी

**वाराणसीच्या** केंट रेल्वेस्थानकावर काल रात्री लागलेल्या आगीत रेल्वे स्थानकाच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या २०० हून अधिक दुचाकी भस्मसात झाल्या आहेत. अग्निशमन दल, रेल्वे पोलीस व राखीव पोलीस दलाच्या जवानांनी या आगीवर नियंत्रण मिळवले.

वाराणसी येथील केंट रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ च्या पाठीमागे रेल्वे कर्मचारी आपली दुचाकी वाहने उभी करत असतात.



काल रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास येथे शॉर्टसर्कीट होऊन आग लागली. ती विझवण्यात आली. त्यानंतर रात्री एक वाजता पुन्हा शॉर्ट सर्कीट होऊन मोठी आग भडकली. दुचाकी गाड्यांमध्ये असलेल्या पेट्रोलमुळे आगीने रौद्र रुप धारण केले. रात्रीच्या सुमारास ही आग लागल्याने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# मलेशियातील भारतीय उद्योजक आनंद कृष्णन यांचे निधन

■ क्वालालंपूर

**मलेशियातील** सर्वांत श्रीमंतांपैकी एक असलेले उद्योगपती आनंद कृष्णन (८६) यांचे आज निधन झाले. कृष्णन हे मलेशियातील सहाव्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती होते.

मलेशियामध्ये दूरसंचार,प्रसारमाध्यमे, पेट्रोलियम व रिअल इस्टेट या क्षेत्रांमध्ये त्यांचा व्यवसाय विस्तारला आहे.कृष्णन यांची एकूण संपत्ती ५.१ अब्ज डॉलर इतकी आहे.हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये शिक्षण झाल्यावर त्यांनी तेल व्यापाराद्वारे आपल्या व्यवसायाला सुरुवात केली.नंतरच्या काळात इतर क्षेत्रांमध्येही त्यांनी आपले स्थान निर्माण केले.मलेशियातील प्रसिद्ध पेट्रोनॉस टॉवर बांधण्याची कल्पना कृष्णन यांनीच तत्कालीन पंतप्रधान महाथीर महंमद यांना दिल्याचे सांगितले जाते.

# सरकारने चिन्मय यांच्यासह १७ जणांची बँक खाती गोठवली

■ ढाका



**देशद्रोहाच्या** आरोपाखाली अटक झालेले हिंदू नेते चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांच्यासह 'इस्कॉन'शी संबंधित १७ जणांची बँक खाती बांगलादेश सरकारने ३० दिवसांसाठी गोठवली आहेत.

'इस्कॉन'वर बंदी घालण्यास उच्च न्यायालयाने नकार दिल्यानंतर सरकार सूडबुद्धीने कृष्णदास यांच्यावर कारवाई करीत असल्याचा आरोप धार्मिक अल्पसंख्य हिंदू समुदायाने केला आहे. दरम्यान, कृष्णदास यांच्या सुटकेची मागणी करण्यासाठी बांगलादेशात अनेक ठिकाणी आंदोलन झाले. 'इस्कॉन' ही कट्टरतावादी संघटना असल्याने तिच्यावर बंदी घालावी,ही बांगलादेश सरकारने केलेली मागणी फेटाळतानाच उच्च न्यायालयाने पुरावे सादर करण्याचे आदेश सरकारला दिले होते.त्यापार्श्वभूमीवर 'इस्कॉन'शी संबंधित लोकांची बँक खाती गोठविण्याची कारवाई केल्याचा दावा केला जात आहे.

# उसाला तुरे फुटले तरी साखर कारखाने बंदच

■ कोल्हापूर

**यंदा** अवकाळी पाऊस तसेच विधानसभा निवडणुकीमुळे लांबणीवर पडलेला ऊस गळीत हंगाम अद्याप सुरू झालेला नाही. गळीत हंगाम लांबल्याने अनेक ठिकाणच्या अडसाली

**शेतकरी अडचणीत**

उसाला तुरे फुटू लागले आहेत. याचा परिणाम ऊस उत्पादनावर होणार असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

कोल्हापूर ऊस उत्पादक जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. ऊस उत्पादनात घट झाल्यास खते, बियाणे, मोलमजुरी, मशागत यांचा ताळमेळ कसा घालायचा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उपस्थित झाला आहे. सध्या उस दरासाठी शेतकरी संघटना आणि आंदोलन अंकुश संघटना आंदोलन छेडत आहे. काही साखर कारखान्यांनी यावर्षीच्या गळीत हंगामाचा दर जाहीर केला आहे. मात्र बहुतांशी साखर



कारखान्यांनी दर जाहीर न केल्याने गळीत हंगाम लांबणीवर पडला आहे.तसेच अतिरिक्त पाऊस,ढगाळ,बदलते वातावरण,पूर यातून वाचलेल्या उसाला तुरे फुटल्याने यंदा उसाचे वजनही घटणार आहे. याचा परिणाम होणार म्हणून ऊस उत्पादनात मोठी घट होणार आहे.

# सातारा जिल्हा गारठला पारा १२ अंशांवर घसरला



■ सातारा

**मागील** दोन दिवसांपासुन संपूर्ण सातारा जिल्हा थंडीने गारठू लागल्याचे चित्र दिसत आहे. काल महाबळेश्वरात १०.५, तर सातारा शहरात १२ अंश तापमानाची नोंद झाली. हे या हंगामातील आतापर्यंतचे नीचांकी तापमान ठरले आहे.

सातारा शहरात थंडीचे प्रमाण वाढले आहे. गुरुवारी १२.५ अंश किमान तापमानाची नोंद झाली होती. पण, काल पहाटेच्या सुमारास शहरात १२ अंशाची नोंद झाली. त्यामुळे झोंबणाऱ्या थंडीचा अनुभव येत आहे. महाबळेश्वरचाही पारा घसरला आहे. याठिकाणी काल १०.५ अंश तापमानाची नोंद झाली. हे या हंगामातील नीचांकी तापमान आहे. आणखी दोन दिवस तापमानात उतार राहिला तर महाबळेश्वरात दवबिंदू गोठण्याची शक्यता आहे. जिल्ह्याच्या अनेक भागातील किमान तापमान १३ अंशाच्या आसपास आहे. सायंकाळी सहानंतरच थंडीला सुरुवात होते. रात्रभर थंडीची तीव्रता जाणवते तर पहाटेच्या सुमारास थंडीचा कडाका जाणवत आहे.



आज कर्जत येथे नवनिर्वाचित आमदार व माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या कन्येच्या विवाह सोहळ्यास वधू-वरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी भाजपा नेते देवेंद्रजी फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुलभाई पटेल आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनिलजी तटकरे उपस्थित होते.

# वेंगुर्ल्यातील म्हापण गावच्या शांतादुर्गाचा आज जत्रोत्सव

■ सिंधुदुर्ग

**वेंगुर्ले** तालुक्यातील म्हापण गावची ग्रामदेवता श्री देवी शांतादुर्गा देवीचा वार्षिक जत्रोत्सव उद्या रविवार १ डिसेंबर रोजी साजरा केला जाणार आहे. स्वयंभू वारूळातून प्रकट झालेली, नवसाला पावणारी व भक्तांच्या हाकेला धावणारी देवी म्हणून शांतादुर्गा देवीची ख्याती आहे.

या जत्रेच्या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जत्रेच्या दिवशी म्हणजे उद्या रविवारी सकाळी धार्मिक विधी, पूजा कार्यक्रम तर रात्री ओटी भरण्याचा कार्यक्रम तसेच रात्री ११ वाजता पालखी मिरवणूक व त्यानंतर पारंपारिक पार्सेकर दशावतार मंडळाचे नाटक होणार आहे. श्री देवी शांतादुर्गा देवस्थानचा वरदहस्त या गावाला लाभलेला आहे. हे देवस्थान एक जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

# पाणबुडी प्रकल्प सिंधुदुर्गातच! केंद्र सरकारने दिली मंजुरी

■ नवी दिल्ली

**महाराष्ट्रातील** सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी पर्यटनाला नवी दिशा देणारा निर्णय केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने घेतला.जिल्ह्यात पाणबुडीबरोबरच समुद्राखालील संग्रहालय, कृत्रिम मासेमारी प्रवाळ याचाही पर्यटन विकास साधला जाणार आहे. यासाठी तब्बल ४६.९१ कोटींचा निधी देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 'एक्स'च्या माध्यमातून केली.

देशभरातील पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने दोन महिन्यांपूर्वी २३ राज्यांकडून प्रस्ताव मागविले होते. एकूण प्राप्त प्रस्तावांपैकी २३ राज्यांमधील ४० प्रकल्पांना विशेष साहाय्य योजनेंतर्गत मान्यता देण्यात



आली आहे. या ४० प्रकल्पांची एकूण किंमत ३,२९५ कोटी रुपये आहे.त्यात महाराष्ट्रातील नाशिक शहर व सिंधुदुर्ग या दोन शहरांचा प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आला आहे. सिंधुदुर्गसाठी ४६.९१ कोटी रुपये, तर नाशिकसाठी ९९.१४ कोटी रुपये अर्थसाहाय्य मंजूर केले.

सिंधुदुर्ग हा देशातील पहिला पर्यटन जिल्हा आहे. येथे गेल्या काही

**४६.९१ कोटी रुपये मंजूर**

वर्षांत पर्यटन विकासाचा वेग वाढला आहे. मात्र, हे पर्यटन विशेषतः किनारपट्टी भागात झुकल्याचे चित्र आहे. असे असले तरी पर्यटन विकासाच्या दृष्टीने जिल्ह्यात अनेक संधी आहेत. यात निसर्ग पर्यटन, धार्मिक पर्यटन आदींचा समावेश आहे.

# कात्रज घाटामध्ये बँक कर्मचाऱ्याची आत्महत्या

**कर्जबाजारी झाल्याने स्वत:चे जीवन संपवले**

■ पुणे

**कर्जबाजारी** झाल्याने एका बँक कर्मचाऱ्याने कात्रज घाटात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. रवी सोनवणे (३६ ) असे आत्महत्या केलेल्या बँक कर्मचाऱ्याचे नाव असून तो त्रिमूर्ती चौक, भारती विद्यापीठ येथे राहत होता.

मृत रवी सोनवणे हे एका खासगी बँकेत कामाला होते. ते दोन दिवसांपूर्वी घरातून बेपत्ता झाले होते. याबाबत त्यांच्या कुटुंबीयांनी ते बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिसांकडे दिली. दरम्यान, कात्रज घाटात झाडाला एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना घटनास्थळावर चिठ्ठी सापडली असून त्यावरुन हा मृतदेह रवि सोनवणे यांचा असल्याची ओळख पटविण्यात आली.

कर्जबाजारी झाल्याने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतल्याचे रवी यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमूद केले आहे. त्यांच्यामागे आई-वडील, पत्नी, मुलगी असा परिवार आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली.

# डॉक्टरचा तरुणीवर बलात्काराचा प्रयत्न

■ परळी

**परळी** शहरातील एका डॉक्टरने आपल्या रुग्णालयात तपासणीसाठी आलेल्या एका २१ वर्षीय तरुणीची छेड काढून तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न केला. या प्रकरणी डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात काल रात्री उशिरापर्यंत संतप्त जमावाने ठिय्या मांडून निवेदन दिले. संबंधित डॉक्टरला तत्काळ अटक करावी अशी मागणी करण्यात आली. या प्रकरणाच्या निषेधार्थ व संबंधित डॉक्टरच्या अटकेसाठी आज परळीत कडकडीत बंद पाळण्यात आला.

याबाबत पोलीस अधीक्षक बीड यांना दिलेल्या निवेदनात

**परळीत कडकडीत बंद**

म्हटले आहे की, काल सायंकाळी परळी शहरातील एका दवाखान्यात २१ वर्षीय युवती तपासणीसाठी गेली होती. यावेळी वैद्यकीय तपासणीचे निमित्त साधून या डॉक्टरने जबरदस्तीने तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तिने निकराचा विरोध केल्याने तिला जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केली. या घटनेबाबत पीडितेने पोलिसांकडे फोनवरून तक्रार केली. या घटनेच्या निषेधार्थ आज परळी शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. सकाळपासूनच परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त रात्रभर लोकलसेवा सुरु ठेवा

**खा. वर्षा गायकवाड यांची मागणी**

■ मुंबई

**संविधान** निर्माते महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने महामानवास अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो अनुयायी दरवर्षी मुंबईत दाखल होत असतात. मुंबईतील चैत्यभूमी येथे लाखोंचा जनसागर भेट देत असतो. दादरला भेट देण्यासाठी मुंबईतील लोकल सेवा ५ व ६ डिसेंबर २०२४ रोजी रात्रभर सुरू ठेवावी अशी मागणी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षाताई गायकवाड यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठवलेल्या पत्रात खासदार वर्षा गायकवाड यांनी असेही म्हटले आहे की, दरवर्षी गणेशोत्सवात गणेशभक्तांसाठी मुंबईतील लोकलच्या विशेष फेऱ्या रात्रभर सुरू असतात. महापरिनिर्वाण दिनीही महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखो भीमसैनिक मुंबईत येतात. पालघर, ठाणे, नवी मुंबई येथून भिमसैनिक दादरला येतात त्यांच्या सोयीसाठी लोकलची विशेष सेवा सुरू ठेवावी.

# रायगडातील बैलगाडी शर्यतींना काशिद येथील शर्यतीने प्रारंभ



■ मुरुड


**रायगड** जिल्ह्यातील हौशी बैलगाडीवानांच्या सन २०२४ -२५ शर्यतींच्या हंगामास मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशिद समुद्र किनारी शुक्रवारी २९ नोव्हेंबरपासून सुरूवात झाली. बोर्ली- मांडला येथील कमाने बंधुंच्या बैलगाडीने या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवून या हंगामाची विजयी सुरुवात केली.

अलिबाग मुरुड विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आलेल्या आमदार महेंद्रशेठ दळवी पुरस्कृत काशिदचे सरपंच संतोष जयराम राणे आयोजित, हौशी बैलगाडी मित्रमंडळ, काशिद-चिकणी यांच्या सहकार्याने ह्या बैलगाडी शर्यती घेण्यात आल्या. आ.दळवींची पुनश्च आमदार म्हणून निवड झाल्याने बैलगाडीवानांना शर्यतीची प्रवेश फी माफ करण्यात आली होती. शर्यतीत अलिबाग तालुक्यातील आवासाच्या निवास भगत यांच्या बैलगाडीने दुसरा क्रमांक, तर काशिदच्याच भरत बेलोसे यांच्या बैलगाडीने तिसरा क्रमांक पटकावला. या तीन विजेत्यांसह हौशी स्पर्धक गटाबरोबरच सर्व सात गटांत प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. शर्यती पाहण्यासाठी अलिबाग, मुरुड, रोहा, श्रीवर्धन तालुक्यातील हजारो शर्यतप्रेमींनी मोठी गर्दी केली होती.

# नांदगाव हायस्कूलमध्ये भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा

**मुरुड-** मुरुड तालुक्यातील यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील सुमारे २६६ विद्यार्थ्यांनी भूगोल प्रज्ञाशोध दिली. इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांसाठी सदर परीक्षा घेण्यात आली. बहुपर्यायी स्वरूपातील या परीक्षेतील प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला पाच हजार रोख रकमेच्या बक्षीसासह अन्य गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे दिली जातात. या परीक्षेसाठी मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण केले.

# मन्ना डे यांच्यावरील पुस्तकाची सुनावणी आता बंगळुरूला होईल



■ बंगळुरू

**दिवंगत** गायक मन्ना डे यांच्यावरील पुस्तकात त्यांच्याविषयी बदनामीकारक मजकूर असल्याने त्या विरोधात दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी बंगळुरुच्या न्यायालयात करता येईल असा निर्वाळा कर्नाटक उच्च न्यालालयाने दिला आहे. मन्ना डे यांची कन्या सुश्मिता यांनी मन्ना डेंवरील पुस्तकाचा लेखक व प्रकाशकाविरोधात हा मानहानीचा दावा दाखल केला आहे.

बंगाली लेखक गौतम भट्टाचार्य यांनी लिहिलेल्या पुस्तकात मन्ना डे यांची बदनामी केल्याबद्दल मन्ना डे यांची कन्या सुश्मिता व त्यांचे पती यांनी लेखक व प्रकाशकाविरोधात बंगळुरुच्या स्थानिक न्यायालयात याचिका दाखल केली होती. हे पुस्तक बंगालीत असून त्याचे प्रकाशक पश्चिम बंगालमधील असल्याचे ही याचिका बंगळुरू न्यायालयाच्या न्यायकक्षेत येत नाही. असे सांगत न्यायालयाने ही याचिका फेटाळली होती. त्याविरोधात सुश्मिता व त्यांचे पती उच्च न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एच.पी. संदेश यांनी आपल्या निकालात सांगितले की, या याचिकेची सुनावणी बंगळुरूमध्ये होऊ शकते. सुश्मिता या बंगलुरुच्या रहिवासी असून हे पुस्तक संपूर्ण देशात प्रकाशित झालेले आहे. कर्नाटकात राहणारे व बंगाली वाचू शकणारेही हे पुस्तक वाचू शकतात. त्यामुळे या खटल्याची सुनावणी इथे घेता येईल.

# नवी मुंबई महानगरपालिकेचा उत्पन्नवाढीसाठी टास्क फोर्स

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी टास्क फोर्सची स्थापन केली असून ही पाच सदस्यीय समिती महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता उपाय सुचविणार आहे.

त्यामध्ये थकबाकी वसूलीकरिता व विद्यमान वसूलीकरिता नियोजन करुन सोबतच उत्पन्नवाढीचे नवीन स्त्रोत सूचित करणार आहे. याबाबतचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याचे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले आहेत.


अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा टास्क फोर्स कार्यरत असणार असून मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मालमत्ता कर विभागाचे उप आयुक्त शरद पवार,



अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण असे चार सदस्य महानगरपालिकेच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नियोजन करणार आहेत.

उत्पन्नवाढीसाठी उपाय सूचविताना टास्क फोर्सने विद्यमान कार्यपध्दतीमध्ये कोणते बदल करावे लागतील याच्या सूचना कराव्यात व असे बदल केल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशा पध्दतीने व किती दिवसात करता येईल आणि कधीपासून उत्पन्नवाढ होईल हे प्रस्तावात नमूद करावे असे सूचित करण्यात आलेले आहे. थकबाकी, चालू वसूली व नवीन स्त्रोतामधून अपेक्षित वाढ याचे नियोजन सादर करण्याच्याही सूचना देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय खर्चात बचत ही एक प्रकारे उत्पन्नवाढ असून त्यादृष्टीने अवाजवी खर्च टाळून व आवश्यक तेथे काटकसर करुन खर्चामध्ये किती बचत होईल याचीही माहिती सादर करण्याचे आदेशात नमूद आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१०९०



**आडवे शब्द –**

२. महानगर ४. सख्खे भावंड ७. सुदृढ ११. धोकादायक १३. आळस, गतिशून्यता १४. पती १६. मैद्यापासून केलेला पोळीचा पर्याय १७. नारळाचे झाड १८. प्रारब्धदेवता २०. चंद्र २२. कढत २३. कृष्णाने वसवलेली राजधानी २४. उपजत आवड २६. आई २७. दयामाया नसलेला २९. शत्रुत्व ३०. मुलीचा पती ३१. प्रवेश ३४. सुकुमार ३६. भल्लातक ३७. अवस्था ३८. काकडी ३९. गुच्छ, स्तबक ४०. उत्सव ४१. छळ ४२. वेष्टन ४३. शिंपल्यातील प्राणी ४५. बातमी ४७. फासळी ४९. हस्तलिखित ५०. टेंभा, मशाल ५३. सतत कार्यरत ५४. घोडा ५५. उशीचे कव्हर ५७. सलगी ५९. कोल्हापुरी दागिना ६०. मनातली गोष्ट ओळखणारा ६१. तसवीर ६३. कपर्दिक ६५. चंचल (तरुणीचे नेत्र) ६६. न्याहारीतला दक्षिणी पदार्थ, डोसा ६८. किंचित ६९. काटकी ७१. मस्त स्त्री ७२. माऊंट अबूची वानरे ७३. जेमतेम, कष्टपूर्वक ७६. तीव्र वाद ७७. सतत आजारी पडणारा ७९. काव्यकर्ता ८०. तीन रस्ते एकत्र येतात ती जागा ८१. परंपरा ८२. गाण्याची पहिली ओळ ८३. प्रत्यंचेचा आवाज ८५. कमळ, मुलींचे एक नाव ८७. नागरिक ८९. अमावास्या (बोली भाषेत) ९०. उत्पन्न ९३. एडका ९४. कमळांचे तळे ९७. नातेवाईक ९९. पवित्र १००. हिस्सा १०१. नाचणीची एक जात १०३. बेकार, तकलादू १०५. ज्याला लिहिता वाचता येत नाही असा १०६. ब्रॉंझ १०७. पिकात उगवलेले त्रासदायक गवत १०८. गावाची सीमा १०९. अंतःकरण

**उभे शब्द –**

१. दहावे नक्षत्र २. गाडा ३. उबदार पांघरूण ४. त्वरित, ताबडतोब ५. केविलवाणा ६. परीट ७. वित्त ८. नुकतेच काढलेले कोमट दूध ९. कंबर १०. लहानसहान कारणावरून चिडणारा, बालीश १२. मोघम काढलेली रक्कम, अनामत १५. हानिकारक १७. चोप १९. बोलणे २१. झुंड २२. काम संपवण्याचा वेग २३. दरवाजा २४. भांडकुदळ स्त्री २५. मग्न २८. भक्कम (पुरावा) २९. चारा ३१. रव्याचा गोड पदार्थ ३२. गोजी, पाडी ३३. अंकुर ३५. देवांचा राजा ३६. अकबराचा हजरजबाबी प्रधान ३८. साबुदाण्याचा लोकप्रिय पदार्थ ३९. पिठले ४१. दक्ष ४२. हेळसांड ४४. लाज, शरम ४५. गाढव ४६. गोड दुधातली बंगाली मिठाई ४८. पाठवणी ५१. बायको ५२. कलंक ५३. स्वतःचे ५५. अडथळा आणणे ५६. सावली ५८. रायगडावरचा प्रसिद्ध कडा ५९. भारतीय स्त्रीचे प्रिय वस्त्र ६१. चांगले ६२. लक्तर ६४. फेरा, लांबचा रस्ता ६५. चुट्टा ६७. व्रत ६९. व्याकूळ ७०. दाणेदार ७१. रगेल, उर्मट ७२. बनारसचा प्रसिद्ध आंबा ७४. बगळा ७५. पृथ्वी आणि आकाशाला जोडणारी काल्पनिक रेषा ७७. निर्भीड मतप्रदर्शन ७८. कोकणातले प्रसिद्ध काटेरी फळ ८३. तजेलदार, प्रसन्न ८४. चांदी ८६. प्रत्येक दिवशी ८७. मराठी दहावा महिना ८८. सोने ९१. गायनातील एक राग ९२. पारशी नववर्षदिन ९३. देव-दानवांनी समुद्रमंथनासाठी वापरलेला पर्वत ९४. दृष्टिक्षेप ९५. एक ज्वालाग्राही पदार्थ, लाक्षा ९६. गुपित ९७. स्त्री ९८. दुर्ग १००. घाव १०२. कमी महत्त्वाचे १०४. पॉपकॉर्न यापासून बनवतात •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०८९ चे उत्तर**

**आडवे शब्द :** ३. वृषभ ५. नावाडी ८. अमाप १०. विकतचे श्राद्ध १२. रखवाली १३. शिरकाव १४. लगत १५. त्वरित १७. विस्तव १८. सकस २१. मनस्वी २३. गलेलठ्ठ २४. रमी २५. कुरंग २७. कान २९. पहिला ३०. लवलेश ३३. पट्ठा ३४. शक ३५. विरजण ३७. बयाणा ३८. साधू ३९. भरभराट ४०. दोरी ४१. घेरी ४३. चाणाक्ष ४५. क्षर ४६. जाणे ४७. पारपटल ४८. तट्टू ४९. चिनी माती ५१. मेंदू ५३. नाराज ५५. मोका ५७. गारुड ५८. बुरखा ६१. टीप ६३. आयकर ६५. जग ६६. कवडीचुंबक ६९. थारा ७०. जड ७१. शुक ७२. वडील ७४. रहदारी ७६. जय ७७. अभ्र ७८. लहानपण ८०. रत ८१. विनाकारण ८३. पिनाक ८५. ठेचा ८६. वर ८८. कुलटा ८९. अढी ९०. लग्न ९१. अटकाव ९३. जोर ९४. गोची ९५. जागणे ९७. साळू ९८. गाणे १००. दामटी १०२. पोतडी १०३. खेळ १०४. कोळी १०५. कमजोर १०६. रग

**उभे शब्द :** १. शकल २. अचेतन ३. वृद्धत्व ४. भरत ५. नावाजलेला ६. वाली ७. हरवलेले ८. अवसर ९. पळस ११. तगमग १३. शिस्त १६. रिपु १७. विठ्ठल १९. कमीपणा घेणे २०. अंकुश २२. स्वीकार २३. गहिवरणे २६. रंक २८. नजराणा ३१. वक्ता ३२. शबरी ३५. विधू ३६. खुरासनी ३८. सामोपचार ४०. दोर ४२. सोपान ४३. चालना ४४. क्षतज ४५. क्षती ४६. जादूगार ४९. चिकाटी ५०. मार्ग ५२. मांडलिक ५४. राखुंडी ५६. जयजयकार ५८. बुगडी ५९. खाक ६०. अंबर ६२. पथारी ६४. कड ६५. जवळ ६७. बहन ६८. कहर ७१. शुभ्र ७३. ललना ७५. दात ठेवणे ७६. जनावर ७७. अणकुचीदार ७८अ. हाकलणे ७९. पर्ण ८२. वाटाघाटी ८३. पिढीजात ८४. बूट ९१. अळू ९२. कागाळी ९३. जोखीम ९६. गडी ९७. साळ ९९. थोर १०१. मग

## राहुल गांधींविरोधात वादविवाद ऐकणे बस चालक-कंडक्टरला भोवले

### सरकारने नोटीस पाठवली

■ शिमला

**हिमाचल** रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (एचआरटीसी) व्यवस्थापनाने शिमला येथील सरकारी बसमध्ये लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात वादविवाद ऐकणे चालक आणि कंडक्टरला चांगलेच भोवले आहे. या प्रकरणी काँग्रेस सरकारने नोटीस बजावली असून, त्यांना तीन दिवसांत उत्तर देण्यास सांगितले आहे.



५ नोव्हेंबर रोजी शिमल्यातील ढाली ते संजौली मार्गावर धावणाऱ्या एचआरटीसी बसमध्ये एक व्यक्ती आपल्या मोबाईलवर मोठ्या आवाजात ऑडिओ क्लिप ऐकत होती. यामध्ये लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात वक्तव्ये होती. याबाबत कोणीतरी मुख्यमंत्री कार्यालयात तक्रार केली. मुख्यमंत्री कार्यालयाने एचआरटीसीला याची दखल घेण्याचे निर्देश दिले. आता एचआरटीसी व्यवस्थापनाने बस चालक आणि वाहकाविरुद्ध चौकशी सुरू केली असून, या दोघांकडूनही स्पष्टीकरण मागितले आहे. यावरून विरोधकांनीही काँग्रेस सरकारवर निशाणा साधला आहे. सरकारच्या अशा निर्णयामुळे हिमाचल आणि संपूर्ण देशाला लाज वाटेल, असेही भाजपाने म्हटले आहे.



## भंगारात काढलेल्या वाहनांच्या भंगार दरात सरकारचा हस्तक्षेप नाही! गडकरींची माहिती

■ नवी दिल्ली

**देशात** जुन्या वाहनांद्वारे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ही वाहने ठराविक वर्षांनंतर भंगारात काढण्याचा नियम आहे. या नियमाद्वारे भंगारात काढण्यात येणाऱ्या वाहनांना मिळणाऱ्या दरात सरकारचा कोणताही हस्तक्षेप नसल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी काल लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

नितीन गडकरी यावेळी म्हणाले की, जुन्या वाहनांना भंगारात काढण्याच्या दराबाबतचा निर्णय त्या वेळची भंगार बाजारातील दर व वाहनाची स्थिती पाहून घेतला जातो. या वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी खासगी संस्था कार्यरत आहेत. भंगारात काढण्यात येणाऱ्या सरकारी वाहनांच्या किमती या भंगारातील लोखंडाच्या दरावरून निश्चित केली जातात. खासगी वाहनांच्या दरात सरकार काहीही हस्तक्षेप करत नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांनी भंगारात विकलेल्या वाहनांवर काही सवलती दिल्या जातात. भंगारात वाहन काढल्यानंतर त्याचे प्रमाणपत्र दिले जाते. त्याच्या आधारे त्यांना नव्या वाहनाचे नोंदणी शुल्क माफ केले जाते. त्याचप्रमाणे खासगी वाहनांना मोटार वाहन करात २५ टक्के तर व्यावसायिक वाहनांच्या बाबतीत १५ टक्के सवलतही दिली जाते, असेही त्यांनी यावेळी सांगितले. देशातील व्यावसायिक वाहने ८ वर्षांनंतर तर खासगी वाहने १५ वर्षांनंतर भंगारात काढावी लागतात.




# राशिभविष्य

**रविवार ०१ डिसेंबर २०२४ ते शनिवार ०७ डिसेंबर २०२४**

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.**

**या सप्ताहात २ डिसेंबर रोजी शुक्र मकर राशीत पदार्पण करेल. हर्षल मेष राशीत, गुरू वृषभ राशीत, मंगळ कर्क राशीत, केतू कन्या राशीत, रवि-बुध वृश्चिक राशीत, शनि कुंभ राशीत, राहू मीन राशीत अशी अन्य ग्रहस्थिती असणार आहे. २ डिसेंबर रोजी मार्गशीर्ष महिना सुरू होत आहे. खंडोबाचा षड्रात्रोत्सव अर्थात देवदिवाळीला यादिवशी प्रारंभ होईल. ६ डिसेंबरला चंपाषष्ठी आहे. या सप्ताहात चंद्राचे भ्रमण वृश्चिक, मकर आणि कुंभ राशीतून होणार आहे.**

## मेष

**सर्वसाधारण सप्ताह**

हा सप्ताह स्थित्यंतराचा राहील. मनस्थिती द्विधा असेल. जोडीदाराबरोबर वाद टाळा. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. घर घेण्याचा विचार करत असाल तर चांगली संधी येईल. मात्र कागदपत्रे नीट तपासून नंतरच निर्णय घ्यावा. विवाहोत्सुक मंडळींचा विवाह जमण्यास अनुकूल कालावधी आहे. कमिशन तत्त्वावर व्यवसाय करणाऱ्यांना अनुकूल काळ आहे. पैशाचे व्यवहार जपून करावेत. उसने, उधार पैसे लवकर मिळण्याची शक्यता नाही. आरोग्याबाबत काळजी घ्यावी. बाहेरील पाणी शक्यतो पिऊ नये. मित्रमंडळींमध्ये चेष्टामस्करी करताना वाद होऊ नये याची काळजी घ्यावी. नोकरीनिमित्त प्रवास होईल. व्यावसायिकांसाठी लाभदायक कालावधी. मात्र भागिदाराशी वादविवाद टाळा.

शुभ दिनांक : ३, ४, ६, ७.

## वृषभ

**शुभ फलिते**

या सप्ताहातील शुक्राचे मकर राशीत होणारे पदार्पण भाग्यकारक ठरेल. कुटुंबामध्ये आनंदी वातावरण राहील. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल. पैशाची आवक राहील. शेजाऱ्यांशी सलोख्याने वागावे. नोकरीच्या शोधात असाल तर प्रयत्नांना यश येईल. नोकरीतील कामानिमित्त प्रवास करावा लागेल. शारीरिक दुखणी बरी होतील. संततीच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे. वडिलधाऱ्या मंडळींशी वाद घालू नये. त्यांच्याशी सल्लामसलत करून निर्णय घ्यावा. नवीन मित्रमंडळींशी संगत जपून करावी. जोडीदाराशी मतभेद टाळा. हाती घेतलेले काम चिकाटीने व जिद्दीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी.

शुभ दिनांक : ४, ५, ६.

## मिथुन

**संमिश्र फलिते मिळतील**

सप्ताहाची सुरुवात चिंता निर्माण करणारी राहील. मानसिक त्रास करून घेऊ नका. बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. कुटुंबियांशी वादविवाद टाळा. पर्यटन क्षेत्राशी संबंधित असणाऱ्यांना चांगला कालावधी. उत्पादन व्यवसाय करणाऱ्यांसाठी यशदायक सप्ताह. संततीसाठी सप्ताह चांगला ठरेल. नोकरीतील कामानिमित्त प्रवास होईल. महत्त्वाची कागदपत्रे गहाळ होऊ नये याची दक्षता घ्यावी. व्यवहार जपून करावेत. व्यवसायानिमित्त परदेशप्रवास घडण्याचे योग. स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी. वाहने जपून चालवा. अविचाराने कोणतीही कृती करू नका.

शुभ दिनांक : २, ३, ६, ७.

## कर्क

**प्रयत्नांना यश लाभेल**

आरंभशूरपणा सोडून जोमाने कार्यरत राहा. तुम्ही करत असलेल्या प्रयत्नांना यश लाभेल. सकारात्मक दृष्टीकोन ठेवा. अवाजवी चिंता करू नका. प्रयत्नांना प्राधान्य द्या. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल. विशेषतः स्त्रीवर्गाकडून पाठबळ मिळेल. कुटुंबियांबरोबर सहलीचे बेत आखण्यास अनुकूलता आहे. एखाद्या धार्मिक स्थळाची यात्रा घडू शकते. नोकरीसाठी प्रयत्न करण्यास सप्ताह अनुकूल आहे. जोडीदाराशी विनाकारण वाद घालू नका. प्रेमाने, सलोख्याने वागा. स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्यांना अधिक मेहनत घ्यावी लागेल. मित्रमंडळींचे सहकार्य मिळेल. त्यांच्याबरोबर वेळ घालवता येईल. स्थावर मालमत्तेबाबतचे वाद सोडवण्यास कोर्टकचेरी करावी लागेल. रागावर नियंत्रण ठेवा. रागाच्या भरात चुकीचे निर्णय घेणे टाळा.

शुभ दिनांक : ३, ४, ५.

## सिंह

**अनुकूल ग्रहमान**

घरातील वातावरण आनंददायी राहील. नियोजित धार्मिक कार्य चांगल्या रीतीने पार पडेल. मातृसौख्य लाभेल. कुटुंबप्रमुखाची भूमिका चांगल्या रीतीने पार पाडाल. व्यवसायात नवीन संधी येतील; नाविन्यपूर्ण बदल घडवता येतील. हाताखालच्या माणसांशी सलोख्याने वागणे महत्त्वाचे आहे. वाहने जपून चालवावी. नवीन गोष्टी शिकण्याकडे कल राहील. नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. नवीन गुंतवणूक नियोजनपूर्वक करावी. समाजात नावलौकीक वाढेल. पाहुणेमंडळीवर खर्च होण्याची शक्यता. जोडीदाराशी पटवून घ्यावे लागेल.

शुभ दिनांक : १, २, ३, ६, ७.

## कन्या

**भाग्याची साथ मिळेल**

आध्यात्मिक वातावरणात रमाल. केतू, शुक्र, प्लुटो व गुरू हर्षल यांचा धर्मत्रिकोणातून होणारा नवपंचम योग अध्यात्मास पूरक ठरेल. नवीन कामाच्या संधी मिळतील. परदेशात जाण्यास अनुकूल कालावधी. आर्थिक प्राप्तीत वाढ होईल. वडिलोपार्जित मालमत्तेची कामे मार्गी लागतील. संततीची शिक्षणात प्रगती होईल. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना अधिक मेहनत घ्यावी लागेल. व्यवसायात प्रगतीकारक कालावधी. लाभ होतील. गुप्तशत्रूंचा त्रास दूर होईल. वाताची दुखणी त्रास देतील. मनःस्वास्थ्य नीट ठेवण्यासाठी योग, प्राणायाम, ध्यानधारणा उपयुक्त ठरेल. आर्थिक नियोजन करताना काळजी घ्यावी. सामाजिक प्रतिष्ठा वाढवेल.

शुभ दिनांक : ४, ५, ६.

## तूळ

**अडचणीतून यश**

या सप्ताहाची सुरुवात फारशी आशादायक नसली तरी नंतर परिस्थितीमध्ये सुधारणा होईल. नवीन व्यवसायासंबंधी सुधारणा होईल. आर्थिक लाभाचे योग आहेत. खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे राहील. वाहनसौख्य मिळेल. कुटुंबामध्ये वाद निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्या. नोकरीमध्ये गुप्तशत्रू ओळखा, सावध राहा. कला, शिक्षण क्षेत्रात असणाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला तरी यश मिळेल. कोणत्याही मोहात अडकू नका. आरोग्याबाबत कुरबुरी राहतील. त्यावर लगेच उपाययोजना करावी. ३ आणि ४ तारखेला आर्थिक व्यवहार केल्यास लाभदायक ठरू शकतात.

शुभ दिनांक : ३, ४, ५, ६, ७.

## वृश्चिक

**कष्टाला भाग्याची साथ**

राशीतील रवि, बुध, चंद्र यशदायक ठरतील. कष्टाला भाग्याची साथ मिळेल. व्यवसायवृद्धीची गती कमी झाल्यासारखी वाटली तरी यश निश्चित आहे. जोडीदाराबरोबर प्रवासाचे योग. घरातील वातावरण आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करावा लागेल. मनात कोणाबद्दल गैरसमजाला थारा देऊ नका. केलेल्या चुका त्रासदायक ठरल्या तरी त्यातून मार्ग निघेल. पित्तप्रकृतीच्या व्यक्तींनी काळजी घ्यावी. डोळ्यांचे आरोग्य जपा. विद्यार्थ्यांनी मन एकाग्र करणे महत्त्वाचे राहील. आर्थिक गणिते सांभाळावीत. प्रियजनांसाठी अचानक खर्च होऊ शकतो. ५ व ६ तारखेला प्रवासातून फायदा संभवतो.

शुभ दिनांक : ४, ५, ६.

## धनु

**नियमांचे पालन करा**

राशीस्वामी गुरू षष्ठात वक्री आहे. दिनक्रम, नोकरीच्या वेळा काटेकोरपणे पाळा. हितशत्रूंवर सत्याच्या मार्गाने विजय मिळवाल. परदेशी, सरकारी क्षेत्राशी संबंधित व्यवसाय असणाऱ्यांना आर्थिक लाभ होईल. मात्र नियमांचे काटेकोर पालन करणे महत्त्वाचे राहील. मित्रमैत्रिणींची मदत होईल. विषाणूजन्य आजारापासून जपा. खाण्यावर नियंत्रण गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष द्यावे. ध्यानधारणा मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरेल.

शुभ दिनांक : १, ३, ४, ५.

## मकर

**नवीन संधी**

राशीस्वामी शनि त्याच्या कुंभ या स्वराशीत वक्री आहे. अनेक नवीन कल्पना सुचतील. त्यामुळे शांत न बसता प्रयत्नवादी व्हा. संभ्रमित न होता संधी, कल्पनांचा अभ्यासपूर्वक विचार करा. मनासारख्या घटना घडतील. प्रियजनांबरोबर आनंदात वेळ जाईल. मात्र वाद टाळा. नोकरीच्या ठिकाणी अडचणी आल्या तरी त्यातून मार्ग निघेल. वरिष्ठांशी जुळवून घेतल्यास अपेक्षित सहकार्य मिळेल. कलाकारांसाठी शुभ काळ. या सप्ताहात तुम्हाला भाग्याची साथ मिळेल. बंडखोर वृत्तीवर नियंत्रण ठेवा. हाताची, खांद्याची काळजी घ्या. १ आणि २ तारखेचा दिवस मित्रांबरोबर आनंदात घालवता येईल.

शुभ दिनांक : ४, ५, ६.

## कुंभ

**मनस्वास्थ्य जपा**

राशी स्वामी तुमच्या राशीत आहे. मनाला आलेली मरगळ झटकण्याचा प्रयत्न करा. कर्माला प्राधान्य द्या. आर्थिक, कौटुंबिक स्थितीकडे आवर्जून लक्ष द्या. कोणताही गैरसमज होऊ देऊ नका. जबाबदारी टाळू नका. वडिलोपार्जित व्यवसायात फायदा होईल. भावनाशील होणे त्रासदायक ठरू शकते. अतिकाळजी, विचार यामुळे मानसिक स्वास्थ्य बिघडवून घेऊ नका. पित्तविकारांपासून जपा. अध्यापक, सल्लागार यांच्यासाठी नवीन संधी येतील. त्या निसटू देऊ नका. जोडीदाराचे कष्ट वाढतील. धाडसीपणा, घाई टाळा.

शुभ दिनांक : ४, ५, ६, ७.

## मीन

**पराक्रमाला वाव**

राशीस्वामी गुरू पराक्रमस्थानी आहे. कलाक्षेत्रात असणाऱ्यांना अचानक नवीन संधी मिळतील. व्यावसायिक करार होऊ शकतात. पुढाकार घ्या. उच्च शिक्षणासाठी प्रयत्न करत असाल तर यश मिळेल. मानसिक अस्वस्थता वाढू शकते. त्यावर नियंत्रण ठेवा. ठरवलेल्या गोष्टी पार पाडण्यावर लक्ष केंद्रित करा. ताकद योग्य ठिकाणी वापरा. अतिधाडस टाळा. जोडीदाराच्या मदतीने यश, आनंद मिळेल. मित्रमैत्रिणींना सध्या लांब ठेवा. सर्व ठिकाणी नियमांचे पालन करा. आळशीपणा सोडून कर्माला प्राधान्य द्या. संधीवात, हाडांची दुखणी यांची काळजी घ्या. ४, ५ आणि ६ हे दिवस केलेल्या कामाचे यश मिळण्यासाठी शुभ राहतील.

शुभ दिनांक : ४, ५, ६.

***

# नवा काळ

• पुणे । रविवार १ डिसेंबर, २०२४ • पान -८


# राज्यात थंडीचा कडाका वाढला

## नाशिक जिल्ह्याला यलो अलर्ट



**मुंबई** - राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला थंडीचा कडाका पुढील दोन ते तीन दिवस वाढणार असून, नाशिक जिल्ह्याला थंडीचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्याच्या सर्वच भागांत तापमानाचा पारा खाली उतरला आहे. उत्तर भारतातून येत असलेल्या वाऱ्यांमुळे राज्यात थंडी वाढल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. राज्यात आजपासून पुढील दोन ते तीन दिवस थंडीची लाट राहणार आहे. नाशिक जिल्ह्यातील जेऊर या ठिकाणी सर्वात नीचांकी ६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. अहिल्यानगर येथे साडेआठ अंश तापमान असून, पुण्यातही पारा खाली गेला आहे. उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातही कडाक्याची थंडी पडली आहे. हिंगोली जिल्ह्यात वाढलेल्या थंडीचा परिणाम सकाळी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर होत असून, शाळेतील उपस्थितीही कमी झाली आहे. नागपूर, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यासह विदर्भातील सर्वच जिल्ह्यात थंडीची लाट आली आहे. राज्यातील अनेक शहरांमधील किमान तापमान ९ ते ११ अंश सेल्सिअस इतके खाली आले आहे.

## थोडक्यात...

### नागपुरात हिट अँड रन दुचाकीस्वाराचा मृत्यू

**नागपूर** - नागपुरात हिट अँड रनची घटना घडली असून, त्यात लँडरोवरच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. हुडकेश्वर येथे काल रात्री ही दुर्घटना घडली. सॅम्युअल त्रिवेदी असे मृत दुचाकीस्वाराचे नाव असून, तो पेशाने पायलट होता. धंतोलीमधील एका मित्राला भेटून परतत असताना हा अपघात झाला. या अपघाताची दृश्ये सीसीटीव्ही कॅमेरात चित्रीत झाली आहेत. दरम्यान, या घटनेनंतर लँडरोव्हरचा चालक गाडी सोडून घटनास्थळावरून पळून गेला. मात्र पोलिसांनी सकाळी त्याला ताब्यात घेतले.

### खा. पप्पू यादव यांना बिश्नोईच्या नावाने पुन्हा धमकी

**पूर्णिया** - बिहारच्या पूर्णिया येथील खासदार पप्पू यादव यांना बिश्नोई टोळीच्या नावाने जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या धमकीनंतर त्यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. खासदार यादव यांना पाकिस्तानातून धमकीचा एक ऑडिओ व्हॉट्सअॅप संदेश आला असून, त्यात पाच कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली आहे. या ऑडिओ संदेशात म्हटले आहे की, आमची तयारी पूर्ण झाली आहे. आमचे सहकारी तुमच्या अगदी जवळ पोहोचले असून, तुमचे रक्षकही आता तुम्हाला वाचवू शकणार नाहीत. तुमचे शेवटचे दिवस आनंदात जाओ. या धमकीनंतर त्यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

### वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

**चंद्रपूर** - झाडे तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या एका ५५ वर्षीय महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. रेखाबाई मारोती येरमलवार असे महिलेचे नाव आहे. निलंसनी पेठगाव येथील रहिवासी रेखाबाई काल निलंसनी पेठगावला लागून असलेल्या वैनगंगा नदीकाठावरील जंगलात गेल्या होत्या. नदीलगतच्या नाल्याजवळ झाडे कापत असताना दबा धरून असलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. त्या सायंकाळी घरी परत आल्या नाहीत. त्यामुळे मुलगा महादेव येरमलवार, राकेश येरमलवार व गावकऱ्यांनी रात्री तिचा शोध घेतला. परंतु या महिलेचा शोध लागला नाही. आज सकाळी त्यांचा मृतदेह सापडला.

### उत्तर प्रदेशात कार अपघात ५ जण ठार! ६ गंभीर

**लखनऊ** - उत्तर प्रदेशातील श्रावस्ती इथे एका कार व टेम्पोच्या धडकेत ५ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात इतर ६ जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आज सकाळी इकौना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहनीपूर तिठ्यावर हा अपघात झाला. श्रावस्तीच्या राष्ट्रीय महामार्ग ७३० वर भरधाव वेगाने जात असलेल्या दोन वाहनांची समोरासमोर धडक होऊन हा अपघात झाल्यानंतर दोन्ही वाहने रस्त्याकडील शेतात पडली.

# अब्दुल सत्तारांविरोधात फौजदारी याचिका



■ छत्रपती संभाजीनगर

**माजी** मंत्री अब्दुल सत्तार यांच्याविरोधात सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका दाखल झाली आहे. निवडणूक शपथपत्रात खोटी माहिती दिल्याप्रकरणी ही याचिका दाखल केली आहे. सिल्लोड येथील सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली आणि पुणे येथील डॉ. अभिषेक हरिदास यांनी अब्दुल सत्तार यांच्या नामनिर्देशन पत्र सोबत सादर केलेल्या शपथबद्ध शपथपत्रावर मतदानापूर्वीच लेखी आक्षेप सादर केला होता. परंतु या आक्षेपावर निवडणूक आयोगाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे आता शंकरपेल्ली व डॉ. अभिषेक यांनी सदर प्रकरणात सिल्लोड दिवाणी तथा फौजदारी न्यायालयात फौजदारी याचिका दाखल केली आहे. अब्दुल सत्तार हे सातत्याने प्रत्येक निवडणुकीत खोटी माहिती देऊन निवडणूक लढवत आहेत, त्यामुळे मतदारांची फसवणूक होऊन मानव अधिकार हक्काचा भंग होत आहे, असा गंभीर आरोप याचिकेत केला आहे. शपथपत्रात खोटी, भ्रामक आणि दिशाभूल माहिती देणे हा लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ कलम १२५ अ नुसार गुन्हा आहे.

# ताकद असेल तर मोदी-शहांनी मतपत्रिकेवर निवडणूक जिंकावी! संजय राऊतांचे आव्हान

■ मुंबई

**देशात** मतदानयंत्राविषयी अविश्वासाचे वातावरण आहे. देशातील जनतेची मागणी असूनही मतदानयंत्रे वापरण्याचा इतका अट्टाहास कशासाठी सुरू आहे? मोदी शहा यांच्याकडे ताकद असेल तर त्यांनी मतपत्रिकेवर निवडणूक घेऊन जिंकून दाखवावे, असे आव्हान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दिले आहे.

संजय राऊत म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम विरोधातील याचिका दोन मिनिटांत निकाली काढली. आम्ही काय म्हणतोय ते ऐकून तरी घ्या. न्यायालय म्हणते की पराभव झाल्यावर तुम्ही



आमच्याकडे येता. वास्तविक आम्ही गेल्या दहा वर्षांपासून ही लढाई लढत आहोत. निकाल सकारात्मक असो वा नसो, आम्ही कायम ईव्हीएमला विरोध केलेला आहे. देशातील जनतेचा एखाद्या गोष्टीवर विश्वास नसेल तर एवढा अट्टाहास का सुरू आहे? यावेळी त्यांनी महायुतीचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही शरसंधान केले. ते म्हणाले की, एकनाथ शिंदे हे आता मोदी व शहा यांचे लाडके राहिलेले नाहीत. त्यावेळी त्यांना शिवसेना फोडली म्हणून मुख्यमंत्रिपद दिले गेले होते. मेहेरबानीखातर त्यांना मुख्यमंत्रिपद दिले होते. तेव्हाच त्यांनी गृहमंत्रीपद घ्यायला हवे होते. तो त्यांचा अंतर्गत प्रश्न असल्याने त्यावर अधिक बोलणे योग्य होणार नाही.

# माझ्या नावाची चर्चा कपोलकल्पित खा. मुरलीधर मोहोळ यांची पोस्ट

■ पुणे

**विधानसभा** निवडणुकीचा निकाल लागून आठवडा उलटल्यानंतरही महायुतीकडून मुख्यमंत्रिपदाचे नाव अद्याप जाहीर केले नाही. शपथविधीला विलंब होत असल्याने मुख्यमंत्रिपदासाठी भाजपामधून वेगवेगळ्या नावांची चर्चा रंगत आहे. यामध्ये पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचेही नाव अनपेक्षितरित्या चर्चेत आले आहे. मात्र आता स्वतः मोहोळ यांनी ही एक्स पोस्ट करून ही चर्चा फेटाळली आहे.

मुरलीधर मोहोळ यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, समाजमाध्यमांमधून माझ्या नावाची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी होणारी चर्चा निरर्थक आणि कपोलकल्पित आहे. आम्ही भारतीय जनता पार्टी म्हणून लढताना महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात लढलो. महाराष्ट्राच्या जनतेने कौलही ऐतिहासिक दिला आहे. आमच्या भारतीय जनता पार्टीत पक्षशिस्त आणि पार्टीचा निर्णय सर्वोच्च असतो. असे निर्णय पार्लमेंटरी बोर्डात एकमतावर घेतले जातात.

# मध्य रेल्वेच्या मुख्य व हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक!



■ मुंबई

**उपनगरी** रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती, तसेच सिग्नल यंत्रणेत काही तांत्रिक कामे करण्यासाठी उद्या रविवार १ डिसेंबर रोजी मध्य रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या सीएसएमटी ते विद्याविहार अप आणि डाऊन धीम्या मार्गावर, तर हार्बर मार्गावरील पनवेल ते वाशी अप आणि डाऊन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेवर दिवसा कोणताही मेगाब्लॉक नाही.

मध्य रेल्वेच्या सीएसएमटी ते विद्याविहार अप आणि डाऊन धीम्या मार्गावर रविवारी सकाळी १०.५५ ते दुपारी ३.२५ वाजेपर्यंत मेगाब्लॉक राहील. या ब्लॉकदरम्यान सीएसएमटी येथून सुटणाऱ्या धीम्या गाड्या सीएसएमटी ते विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवल्या जातील. या गाड्या भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांत थांबतील आणि पुढे विद्याविहार स्थानकापासून डाऊन मार्गावर वळवण्यात येतील. तसेच हार्बर रेल्वे मार्गावर पनवेल-वाशी अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.०५ ते सायं. ४.०५ वाजेपर्यंत ब्लॉक असेल. ब्लॉक कालावधीत पनवेल/बेलापूर येथून सीएसएमटीकडे जाणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा आणि सीएसएमटी येथून पनवेल/बेलापूरकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा रद्द राहतील. पनवेल येथून ठाण्याकरिता सुटणाऱ्या अप ट्रान्सहार्बर मार्गावरील सेवा आणि पनवेल येथून ठाण्याकरिता सुटणाऱ्या डाऊन मार्गावरील सेवा रद्द होतील.

# आई-बहिणीवरून शिव्या दिल्यास दंड

■ अहिल्यानगर

**सौंदाळा ग्रामसभेचा ठराव**

**अहिल्यानगर** जिल्ह्याच्या नेसासे तालुक्यातील सौंदाळा ग्रामपंचायतीने ग्रामसभेत एक अनोखा ठराव घेतला आहे. या ठरावानुसार गावात जर का कोणी शिवी दिली तर त्याला ५०० रुपयांचा दंड केला जाईल. अनेक वेळा भांडणे झाल्यानंतर कारण नसताना आई बहिणींवरून शिव्या दिल्या जातात. त्यात आई-बहिणींची चुकी नसताना असे अपशब्द वापरले जातात. हे टाळले जावे यासाठी ग्रामसभेने हा निर्णय घेतल्याचे सरपंच शरद अरगडे यांनी सांगितले. यातून शिव्या देणाऱ्यांना पायबंद बसेल. शिवाय एक शिस्तही लागेल. महिलांचा सन्मानही राखला जाईल, असे त्यांनी सांगितले.

# ईव्हीएम पडताळणीसाठी २४ पराभूत उमेदवारांचे अर्ज! काँग्रेसला आयोगाचे बोलावणे

■ मुंबई

**विधानसभा** निवडणूक निकालानंतर विरोधकांनी ईव्हीएमविरोधात मोहीम सुरू केली आहे. ईव्हीएममध्ये गडबड असल्याचा पराभूत उमेदवारांना संशय असल्याने महाराष्ट्रातल्या एकूण २४ पराभूत उमेदवारांनी ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केले आहेत. विशेष म्हणजे, यामध्ये भाजपा उमेदवार राम शिंदे यांचाही समावेश आहे. त्यामुळे विरोधकांनंतर आता सत्ताधाऱ्यांचाही ईव्हीएमवर विश्वास नसल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, काँग्रेस पक्षाने ईव्हीएमवर केलेल्या आरोपावर चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाच्या



शिष्टमंडळाला ३ डिसेंबर रोजी चर्चेसाठी बोलावले आहे.

उमेदवारांना एकूण मतदान केंद्रांच्या पाच टक्के मतदान केंद्रांवरील ईव्हीएम पडताळणी करता येते. एका केंद्रावरील ईव्हीएम पडताळणीसाठी ४७,२०० रुपये शुल्क लागते. न्यायालयात कुणी आव्हान न दिल्यास अर्ज केल्याच्या ४५ दिवसांत ही पडताळणी होते.

ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांमध्ये काँग्रेसचे बाळासाहेब थोरात (संगमनेर), काँग्रेस रमेश बागवे (पुणे कॅन्टोनमेंट), भाजपाचे राम शिंदे (कर्जत जामखेडचे), शरद पवार गटाचे उमेदवार अभिषेक कळमकर (नगर शहर), शरद पवार गटाच्या राणी लंके (पारनेर), शरद पवार गटाचे प्राजक्त तनपुरे (राहुरी), शरद पवार गटाचे संदीप वरपे


पान २ वर


# संसदेत मी केवळ तुमच्यासाठीच प्रियंका गांधींकडून मतदारांचे आभार



■ वायनाड

**वायनाड** पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज पहिल्यांदाच आपल्या मतदारसंघात जाऊन मतदारांचे आभार मानले. यावेळी त्यांच्या बरोबर काँग्रेस खासदार व त्यांचे ज्येष्ठ बंधू राहुल गांधीही उपस्थित होते. वायनाड मतदारसंघात आज त्यांनी ४ जाहीर सभा घेतल्या. यावेळी हजारो वायनाडवासीय उपस्थित होते.

वायनाडच्या खासदार म्हणून लोकसभेत शपथ घेतल्यानंतर आज प्रियंका गांधी यांनी राहुल यांच्यासह वायनाडमध्ये जाऊन मतदारांशी संवाद साधला. या मतदारसंघात कोझिकोड, करुलाई निलांबुर, वंदूर, एडवन्ना, एरानाड येथे जाहीर सभा घेतल्या. प्रियंका गांधी यावेळी म्हणाल्या की, मी आतापर्यंत ३५ वर्षे निवडणुकीचा प्रचार केला, यावेळी मी पहिल्यांदा लढले व तुम्ही मला विजयी केलेत. संसदेत मी केवळ तुमच्यासाठीच हे लक्षात ठेवा. तुमचे प्रेम व विश्वास माझ्यासाठी फार महत्त्वाचा आहे.

राहुल गांधी यावेळी म्हणाले की, प्रियंका गांधी या तुमच्या आता खासदार आहेत. त्यांना तुम्ही विजयी केलेत, जो आत्मविश्वास दिलात त्याबद्दल मी आभारी आहे.

# सीएनजी महागल्याने रिक्षा भाडे वाढवण्याची मागणी

■ नवी मुंबई

**दोन** दिवसांपूर्वीच सीएनजी दरामध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे रिक्षा मीटर भाड्यातही ३ रुपयांची वाढ करावी, अशी मागणी महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी नवी मुंबई सहाय्यक उपप्रादेशिक अधिकारी गजानन गावडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

सहाय्यक उपप्रादेशिक अधिकारी गजानन तावडे यांची महाराष्ट्र कर्मचारी युनियनच्या शिष्टमंडळाने नुकतीच भेट घेतली आणि रिक्षा व्यवसायातील अडचणी त्यांच्यापुढे मांडल्या. यावेळी रविंद्र सावंत यांच्यासमवेत युनिट अध्यक्ष विवेक पवार, संदीप बागडे, राजू कदम, गणेश शिंदे, वामन रंगारी, विनोद मालुसरे, देसाई बुवा, शिष्टमंडळात सहभागी झाले होते. पेट्रोलपंपावर गॅस ७७ रुपये किलो या दराने विकला जात आहे. सीनजी गॅसची किंमत वाढल्याने त्याचा फटका गोरगरीब रिक्षाचालकांना बसला आहे. कारण सीएनजी दर वाढले असले तरी रिक्षाचालकांना आहे त्याच मीटर दरात व्यवसाय करावा लागत आहे. कोरोना काळापासून रिक्षा व्यवसायात मंदी आहे. त्यातच रिक्षा घेण्यासाठी काढलेले पतसंस्थांचे कर्ज, घरांचे भाडे, मुलांचे शिक्षण, घरखर्च आदींची सांगड घालणे रिक्षाचालकांना अवघड जात आहे. त्यामुळे सीएनजीचे दर वाढल्याने रिक्षाचे मीटर २३ रुपयांऐवजी २६ रुपये करण्यात यावे. जेणेकरुन रिक्षाचालकांच्या व्यवसायात होणारा आर्थिक तोटा भरून निघेल, अशी मागणी या रिक्षा संघटनेने केली आहे.

# भारताची परकीय गंगाजळी १.३१ अब्ज डॉलरने घटली

■ मुंबई

**भारताची** परकीय गंगाजळी २२ नोव्हेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात १.३१ अब्ज अमेरिकन डॉलरने घसरून ६५६.५८२ अब्ज डॉलरवर आली, अशी माहिती आरबीआयने काल दिली. सप्टेंबरच्या अखेरीस ७०४.८८५ अब्ज अमेरिकन डॉलरचा सार्वकालिक उच्चांक गाठणारी गंगाजळी गेले काही आठवड्यांपासून घसरत आहे. २२ नोव्हेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात परकीय गंगाजळीचा एक प्रमुख घटक असलेली विदेशी चलन मालमत्ता ३.०४३ अब्ज डॉलरने घटून ५६६.७९१ अब्ज डॉलर झाली. दरम्यान, या आठवडाभरात देशातील सोन्याचा साठा १.८२८ अब्ज डॉलरने वाढून ६७.५७३ अब्ज डॉलर झाला. तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील भारताचा साठाही ४२ दशलक्ष डॉलरने घसरून ५.१७४ अब्ज डॉलर इतका राहिला, असे रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीत दिसून आले आहे.





